# શ્રી સાંઈલીલા



स्थापना १९१६




सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर,** टे. नं.

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २ २५५७३१



# श्री साई वाक्सुधा

भाव तसा देव. मंत्र, तीर्थ, ब्राह्मण, देव, ज्योतिषी, वैद्य व गुरु यांच्यावर
तुम्ही जशी श्रद्धा ठेवाल तसें तुम्हाला फळ मिळेल. ज्या प्रमाणांत श्रद्धा
त्या प्रमाणांत फळ. केवळ वरकरणीं भाव असला तर तुम्हांला कांहींएक
फळ मिळणार नाहीं आपण कोणाचें वाईट चिंतूं नये. चांगलें चिंतावें.
चांगलें व जें कल्याणाचें असेल तें सांगावें. ज्याच्या दैवांत जसे असेल
तसे घडेल. तुम्ही कोणाचेंही दैव बदलू शकत नाहीं. योग्य सल्ला देणें तुमचें
कर्तव्य. ऐकणें न ऐकणें दुसऱ्याचें काम त्याची चिंता तुम्ही बाळगण्याचें
कारण नाहीं.

—श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ] नोव्हेंबर १९६६ [ अंक ८ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

अठ्ठेचाळीस वर्षांपूर्वी पवित्र व शुभ अशा विजयादशमी दिवशीं श्रीसाईबाबा ऐहिक अर्थानें निजधामास गेले. ते गेले कसले? एका कवीनें म्हटल्याप्रमाणें 'जे एकाठायीं होते। ते सर्वांठायीं भिनले।' त्यांच्यामागें आजही त्यांच्या दयाळुत्वाची, लोककल्याणाच्या दक्षतेची व दुःखितांचें हरप्रकारचें दुःख दूर करण्याच्या त्यांच्या तत्परतेची साक्ष त्यांच्या भाविक व निष्ठावान् भक्तांना पुरेपूर येत आहे.

ज्याला साधुत्व किंवा देवत्व म्हणतात तें बाबांच्या ठायीं पूर्णत्वानें होतें. बाबांनीं आपली सारी हयात लोककल्याण साधण्यांत, जनतेचें परोपरीनें मार्गदर्शन करण्यांत व ज्याला जें हवें तें मुक्तहस्तानें देण्यांत घालविली.

संतांचा अवतार लोककल्याण साधण्यासाठीं व त्यांना सन्मार्गाला लावण्यासाठीं असतो. 'भूतदया' हेंच त्यांचें भांडवल असतें व त्यांतच त्यांची इतिकर्तव्यता असते.

महाराष्ट्रांत असंख्य संत-कवि होऊन गेले. मुकुंदराय, ज्ञानेश्वरापासून तों तुकाराम-रामदासांपर्यंत किंवा आधुनिक काळापर्यंत यायचें तर ह. भ. प. दासगणूपर्यंत संतकवींची मालिका सांगतां येईल. त्यांच्या सत्कृति जशा आपल्यापुढें आहेत, त्याचप्रमाणें, त्यांचें असर्याद बोधपर व मार्गदर्शक असें काव्यवाङ्मय त्यांनीं आपल्यामार्गें ठेविलें आहे.

साईबाबांनीं काव्यरचना केली नाहीं किंवा बोधपर लेखनहि केलें नाहीं. ते जीवनभर प्रत्यक्ष कृतीनें काव्यामृताचे पेले आपल्या सान्निध्यांत येणाऱ्यांस पाजीत होते. त्यांच्या त्या जीवन-काव्याचा परिचय त्यांचे परम भक्त श्री. हेमाडपंत ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर यांनीं श्रीसाईसच्चरिताच्या रूपानें आपल्या प्रासादिक गोड वाणीनें आपणास करून दिलेला आहे.

तीच आहे साईभक्तांची गीता अथवा गाथा. तिचें भक्तिभावानें पठण, मनन करणाऱ्यास श्रीसाई अवताराचें रहस्य समजल्याशिवाय रहाणार नाहीं.

बाबांनीं आपल्या हयातींत अर्थात् जनतेंत वावरत असतां लोककल्याण जितकें साधतां येईल तेवढें साधलें; परंतु त्यांच्या निर्याणास आज अठ्ठेचाळीस वर्षांचा दीर्घ काळ लोटला तरीहि त्यांच्या अस्तित्वाची व त्यांच्या परोपकार तत्परतेची जाणीव त्यांच्या भक्तांना पुरेपूर येत आहे.

या नश्वर जगाचा निरोप घेतांना त्यांनीं आपल्या भक्तांना उद्देशून जें आश्वासन दिलें त्याचा पूर्ण प्रत्यय प्रत्येक भक्ताला येत आहे. जो जो भक्तिभावानें व श्रद्धायुक्त अंतःकरणानें माझें स्मरण करील, तो कुठेंही असला तरी मी त्याची इच्छा पूर्ण केल्याशिवाय रहाणार नाहीं.

आज बाबांच्या भक्तांना 'शिरडी माझें पंढरपूर' असें वाटतें व रोजच्या रोज तेथें बाबांच्या दर्शनासाठीं वाढत्या संख्येनें भक्तांची गर्दी होत असते तिचें कारण काय ? भारताच्या निरनिराळ्या भागांतून तेथं स्त्रीपुरुष प्रवासाचा त्रास सोसून व पैसा खर्च करून येतात ते कशासाठीं ? कारण बाबांच्या भक्तीमुळें, त्यांचें पुण्यस्मरण केल्या-मुळें त्यांचें दुःख निवारण किंवा संकट निवारण झालेलें असतें. आजवर तें घडत आलेलें आहे.

बाबांच्या अवतार कार्यांतील ही एक प्रकारची किमया आहे. हें भक्तिभावाचें लेणें आहे. हें श्रद्धेचें फळ आहे.

बाबांनीं आपल्या भक्तांना उद्देशून जें जें आश्वासन दिलें तें तें पूर्णत्वास आलें आहे. प्रत्येकाचे अनुभव वेगवेगळे असूं शकतील; हा निष्ठेचा प्रश्न आहे.

विजयादशमीचा शुभ दिवस प्रत्येक वर्षी येतो, अशा एका दिवशीं बाबा जगाचा निरोप घेऊन गेले असें आम्हांला वाटतें; परंतु तें वाटणें चुकीचें आहे; बाबा आजहि आमच्यांत वावरत आहेत. आमच्या सर्व कृत्यांकडे त्यांची नजर आहे. आजही आम्हीं त्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें तर आमचें पाठीराखेपणा ते करीत आहेत. आम्हीं मात्र आमच्या कर्तव्याला जागलें पाहिजे.

आम्हीं जगांत कसें वागावें, आपलें जीवन कसें घालवावें, इतरांशीं कसें वागावें हें बाबांनीं आपल्या वागणुकीनें आम्हांला शिकविलें. ती त्यांची शिकवण आम्हीं लक्षांत बाळगली व ती आचरण्यांत आणण्याचे प्रयत्न आम्हीं प्रामाणिकपणें केले तर बाबांना जो,संतोष होईल तसा दुसऱ्या कशानेंही होणार नाहीं. तेव्हां या पवित्र दिवशीं बाबांचें पुण्यस्मरण करून त्यांच्या शिकवणीप्रमाणें वागण्याचा व त्याद्वारें आपलें कल्याण साधण्याचा आम्हीं निर्धार करूंया.

—संपादक

# दैवी संपदा हाच खरा अलंकार

—गुरुदेव रानडे

सॉक्रेटिसाप्रमाणें सद्‌गुण व ज्ञान यांचें ऐक्य व भगवद्गीतेप्रमाणें ज्ञान म्हणजे बहुमोल सद्‌गुण हें मत श्री ज्ञानेश्वरांनीं कसें प्रतिपादिलें आहे हें आपण पाहिलें. दुर्गुणांविषयींहि त्यांनीं असेंच ज्ञानप्रधान मत मांडलें आहे. अज्ञान म्हणजे ज्ञानाचा अभाव म्हणजेच अर्थात् वर सांगितलेल्या सर्व सद्‌गुणांचा अभाव होय. "अज्ञानं यदतोऽन्यथा" या भगवद्गीतेंतील सूचक विधानावरून श्री ज्ञानेश्वरांनीं कोणत्या गुणाचा अभाव म्हणजे अज्ञान याचें विस्तृत विवेचन केलें आहे. वर दिलेल्या प्रत्येक सद्‌गुणास विरोधार्थक दुर्गुण असून त्या प्रत्येकाचीं लक्षणें श्री ज्ञानेश्वरांनीं सविस्तर दिलीं आहेत. दिवस सरला कीं रात्र येते, त्याप्रमाणें ज्ञान संपलें कीं अज्ञानाचें साम्राज्य सुरू होतें. त्या अज्ञानाचीं कांहीं लक्षणें आतां आम्ही सांगतों–"अज्ञानी मनुष्य दुसऱ्यांनीं दिलेल्या मानावर जगतो; तो मानाची वाट पाहतो व सत्कारानें त्याला संतोष वाटतो; आपलें महत्त्व कमी होईल म्हणून जो गर्वाच्या पर्वतशिखरावरून खालीं येतच नाहीं, त्याच्या अंगीं पूर्ण अज्ञान भरलेलें आहे असें समजावें. देवळाच्या शिखरावर केरसुणी उभी करावी, त्याप्रमाणें तो शब्दांच्या मोठ्या वृक्षावर आपल्याच गुणांची कमान उभी करतो, आपल्या विद्येचें प्रदर्शन मांडतो व आपल्या सुकृताचा डांगोरा पिटतो. तो जें कांहीं करतो, तें आपल्या प्रसिद्धीसाठींच करतो. अरण्यांत वणवा पेटला म्हणजे तो जसा सर्व स्थावर–जंगमास जाळतो, त्याप्रमाणें त्याच्या वर्तनानें सर्व जगास दुःख होतें. तो सहज थट्टेनें जें बोलतो तें बरचीपेक्षांहि तीक्ष्ण व मर्मभेदक आणि विषाहूनहि मारक असतें. वावटळींत सांपडलेली धूळ ज्याप्रमाणें उंच आकाशांत चढते, त्याप्रमाणें तो स्तुतीच्या आनंदानें चढतो. चिखल थेंबभर पाण्यानें विरतो व वाऱ्याच्या झुळकीनें सुकतो त्याप्रमाणें थोडीशी निंदा ऐकली तरी तो आपलें कपाळ धरून बसतो. तो मनानें आंतल्या गांठीचा असतो व त्याच्या बडबडीस निर्बंध नसतो. तो समक्ष एकास संमति दाखवितो व मागें दुसऱ्यासच मदत करतो. पारध्यानें हरणापुढें ठेवलेल्या गवताप्रमाणें, शेवाळानें भरलेल्या दगडाप्रमाणें किंवा पिकलेल्या निंबोण्यांप्रमाणें त्याची बाह्य कृति वरपांगी व दुष्ट असते. त्यास गुरुकुळाची लाज वाटते; गुरुभक्तीस तो त्रासतो; गुरूपासून विद्या शिकून तो त्याच्याशीं मस्तीनें

वागतो. तो शरीरानें व कृतीनें ढिला असतो व अरण्यांतील निकामी विहिरींत ज्याप्रमाणें वर कांटे व आंत हाडें असतात, त्याप्रमाणें त्याचें मन संशयानें व विकारानें भरलेलें व अंतर्बाह्य घाणेरडें असतें. भुकेला कुत्रा ज्याप्रमाणें पोटासाठीं उघडें—झांकलें म्हणत नाहीं, त्याप्रमाणें तो द्रव्याच्या बाबतींत आपलें व दुसऱ्याचें जाणत नाहीं. ग्रामसिंहास ज्याप्रमाणें भक्ष्याभक्ष्याचा विचार नसतो, त्याप्रमाणें दुर्गुणी मनुष्य स्त्रियांविषयीं कांहींहि विचार करीत नाहीं. नित्य—नैमित्तिक कर्मांची वेळ चुकली तर त्यास दुःख होत नाहीं. पाय ठेवल्याबरोबर डबक्यांतलें पाणी जसें गढूळ होतें, त्याप्रमाणें भीतीच्या नुसत्या नांवानेंहि त्याचें मन गडबडतें.

पुरांत पडलेल्या भोपळ्याप्रमाणें वासनांच्या प्रवाहाबरोबर त्याचें मन वाहवतें. अशा मनुष्याच्या ठायीं गाढ अज्ञान वसतें; कारण चांचल्यांत तो माकडाचा भाऊ असतो. मोकाट सोडलेल्या बैलाप्रमाणें, अफाट वादळाप्रमाणें, माजलेल्या हत्तीप्रमाणें किंवा डोंगरावरील वणव्याप्रमाणें त्याचें मन विषयांत भडकत राहतें. तो इंद्रियसुखांत नखशिखान्त बुडलेला असतो ! त्याला कामक्रीडेचें व्यसनच असतें. विरक्त मनुष्याचें तोंड पाहून तो सचैल स्नान करतो. गाढवास जवळ येऊं न देतां गाढवी उड्या मारते व लाथांनीं त्याचें नाक फोडते, तरीहि गाढव माघार घेत नाहीं, त्याप्रमाणें इंद्रियसुखासाठीं विषयांच्या जळत्या आगींत तो उडी घेतो व व्यसनांचे दागिने अंगावर मिरवितो. मृगजळामागें लागून हरणाचें डोकें फुटलें तरी हरण धांवतच राहतें, त्याप्रमाणें जन्मापासून मृत्यु येईपर्यंत इंद्रियसुखांमागें तो धांवतच असतो. त्यांत त्यास अतिशय त्रास झाला तरी त्याचा त्रास न मानतां उलट तो त्यांवर जास्तच प्रेम करतो. बाळपणीं तो आईवर प्रेम करतो, तारुण्यांत स्त्रीमांसानें भुलून जातो व स्त्रीसंभोगांत म्हातारपण आलें तरी तोच प्रेमभाव तो आपल्या मुलांवर केंद्रित करतो. या सर्व बाबतींत तो 'देहच आत्मा' असें मानून त्याप्रमाणें वागतो.

देव अंगांत आणणारा मनुष्य ज्याप्रमाणें डोक्यावर फुलें ठेवतांच देव अंगांत शिरला म्हणून घुमूं लागतो, त्याप्रमाणें तो विद्या व तारुण्य यांच्या अभिमानानें उताणा चालूं लागतो. माझ्यापेक्षां थोर व प्रसिद्ध कोणीहि नाहीं, मीं सर्वज्ञ आहे, असा गर्व बाळगून तो गाल फुगवून बोलूं लागतो. दिवा ज्याप्रमाणें वात खातो, तेल जाळतो व फक्त काजळी मात्र मागें राहते, त्याप्रमाणें तो आपले सर्व गुण आणि स्नेह जाळतो व केवळ काजळीप्रमाणें राहतो. मिणमिण दिव्याची ज्योत ज्याप्रमाणें किंचित् पाणी टाकलें तर तडतडते व थोडा वारा लागला तर विझते, पण लहानशी काडी मिळाली तरी पेट घेते, अगदीं थोडासा प्रकाश देते व तेवढीच ऊब धरते, त्याप्रमाणें थोड्याशा ज्ञानानें देखील तो आपणास सुविद्य मानतो. अंत्यजास सिंहासनावर बसवावें किंवा अजगरानें वाळलेलें लांकूड गिळावें, त्याप्रमाणें तो गर्वानें

फुगलेला दिसतो. तो लाटण्याप्रमाणें लवत नाहीं, दगडाप्रमाणें द्रवत नाहीं व फुरसें ज्याप्रमाणें गारुड्यासहि दाद देत नाहीं, त्याप्रमाणें तो कोणासहि बधत नाहीं. त्याचा जीवनावर इतका भयंकर विश्वास असतो कीं, या जगांत मृत्यु म्हणून कांहीं वस्तू आहे असें त्याचें मन मानतच नाहीं.

उथळ पाण्यांतील माशास ज्याप्रमाणें हें पाणी आटेल म्हणून आपण खोल पाणी असलेल्या डोहांत जावें असें वाटत नाहा, त्याप्रमाणें मृत्यूच या जीवनरूपानें आला आहे हें राजविलासांमुळें त्यास उमजतच नाहीं! वेश्येनें आपलें सर्वस्व देणें म्हणजेच तिची नागवणूक होय; सावासारख्या चोराची मैत्री म्हणजे आपलें मरण व मातीच्या चित्रास स्नान घालणें म्हणजे त्याचा नाश ही गोष्ट त्या बापड्यास कळत नाहीं. फांशीं जाणारा मनुष्य सुळाकडे जाऊं लागला म्हणजे प्रत्येक पावलागणिक तो मृत्यूजवळ जातो, त्याप्रमाणें जसजशी देहाची वाढ होते व सुख वाढते तसतसा मृत्यु जीवास जिंकतो व पाण्यांत मीठ विरघळत जातें त्याप्रमाणें आयुष्य कमी कमी होत जातें. कड्यावरून लोटलेला गाडा किंवा पर्वतशिखरावरून सुटलेला धोंडा निश्चितपणें खालीं येणार, त्याप्रमाणें आपणास पुढें वार्धक्य निश्चित येणार हें त्यास दिसत नाहीं. आडरानांतील ओढ्याचें पाणी मातवें किंवा दोन झुजणारे रेडे मदानें वेडे होतात, त्याप्रमाणें त्याच्या अंगांत तारुण्याचें वेड शिरलेलें असतें. वाघाच्या अरण्यांत चरावयास जाऊन एकदां अकस्मात् जिवंत परत आलेल्या बैलास पुनः तेथें जाण्याची इच्छा व्हावी त्याप्रमाणें सर्पाच्या तावडीतून चुकून एखादे वेळीं संपत्ति आणली तरी तेथें साप आहे व ही संपत्ति लवकरच नाहींशी होऊन आपल्यावर तात्रडतोब संकट ओढवेल याची कल्पना त्यास येत नाहीं. या क्षणिक संपत्तीच्या जोरावर व तारुण्याच्या भरांत तो सेव्यासेव्य सारखेंच मानतो, जाऊ नये तेथें जातो, पाहूं नये तें पाहतो, धरूं नये त्याचा संग धरतो, खाऊं नये तें खातो, पाहूं नये तें पहातो, धरू नये त्याचा संग धरतो, खाऊं नये तें खातो, ऐकूं नये तें ऐकतो, बोलूं नये तें बडबडतो व करूं नये तें करतो. नवीन सुवासिक कमळांच्या केसरांत भ्रमरी गुंगते, त्याप्रमाणें त्याची प्रीति घरीं गुंतलेली असते. साखरेच्या राशीवर बसलेली माशी उठत नाहीं, त्याप्रमाणें त्याचें मन स्त्रीवर आसक्त असतें. मन स्त्रीवश झाल्यामुळें त्यास आपलें हित कळत नाहीं, त्यास लाज वाटत नाहीं व दुसऱ्याच्या टीकेकडे तो लक्ष देत नाहीं. त्याचीं सर्व इंद्रियें स्त्रीवश झाल्यानें तो गणिकेच्या नादीं लागतो. गारुडी नाचवील तसें माकड नाचतें, त्याप्रमाणें तिच्या छंदानें तो नाचतो. एकनिष्ठ भक्त आपल्या कुलदेवतेची पूजा करतो, त्याप्रमाणें तो एकाग्र चित्तानें आपल्या स्त्रीची उपासना करतो. तिच्याकडे कोणी वांकड्या नजरेनें पाहिलें किंवा तिच्या विरुद्ध गेलें तर प्रलय होईल असें त्याला वाटतें.. देवाची भक्ति केलीच तर तो कांहीं तरी फलाशा धरून

करतो व भजन केल्याबरोबर जर त्याची इच्छा सफल झाली नाहीं तर त्याचा विश्वास उडतो व देव खोटा म्हणून तो त्याची भक्ति सोडून देतो.

खेडवळ कुणब्याप्रमाणें याप्रकारचे तो एकामागून एक अनेक देवास भजतो. ज्याची कीर्ति व भरभराट असेल अशा गुरूच्या मार्गाचा अवलंब करतो व त्यापासून मंत्र शिकतो. तो माझी मूर्ति आपल्या मर्जीप्रमाणें बनवितो व ती घरांतील एका कोपऱ्यांत ठेवून आपण अनेक देवदेवींच्या यात्रेस निघून जातो. खऱ्या देवाची पूजा रोज केली पाहिजे; परंतु तो विशेष कार्यासाठीं कुलदेवतेची पूजा करतो व विशेष पर्वकाळीं आणखी निराळ्या देवांची पूजा करतो. घरीं खऱ्या देवाची प्रतिष्ठापना केली असली, तरी नवस इतर देवांना करतो. श्राद्धाच्या दिवशीं पितरांची पूजा करतो. एकादशीच्या दिवशीं जितक्या भक्तीनें तो विष्णूची पूजा करतो तितक्याच भक्तीनें तो नागपंचमीच्या दिवशीं नागाची व वद्य चतुर्थीस दुर्गेची पूजा करतो. नित्यनैमित्तिक कर्मैं टाकून तो नवचंडी–होम करतो. रविवारीं भैरवास प्रसन्न करण्यासाठीं अन्नदान करतो, तर सोमवारीं बेलपत्रांनीं शिवलिंगाची पूजा करतो.

याप्रमाणें तो एकटाच सर्व देवांची पूजा करतो. गांवाच्या वेशीच्या द्वाराजवळ उभी राहून वेश्या ज्याप्रमाणें प्रत्येक पुरुषाचें लक्ष आपल्याकडे वेधण्याचा प्रयत्न करते, त्याप्रमाणें त्याचें रोज अनेक देवांचें अखंड भजन चाललेलें असतें. अर्जुना, असा या देवापासून त्या देवाकडे सैरावैरा धांवणारा भक्त म्हणजे अज्ञानाची मूर्तीच समज. अशा मनुष्याला जनसमुदाय प्रिय वाटतो, गजबजलेलें शहर आवडतें व गप्पा मारण्यांत आनंद वाटतो. जर खऱ्या आत्मज्ञानाच्या मार्गाविषयीं त्याच्यापुढें कोणी बोलूं लागला तर तो अत्यंत गोंगाट व उपहास करतो व त्याचें बोलणें ऐकून घेण्यास मुळींच तयार नसतो. उपनिषदांकडे तो ढुंकूनहि पाहत नाहीं. त्यास योगशास्त्र आवडत नाहीं, अध्यात्मशास्त्रांत त्याचें मनच लागत नाहीं. परमार्थावांचून बाकी सर्व विषय त्याला आवडतात. कर्मकांड त्याला माहीत असतें, पुराणें मुखोद्गत असतात. तो म्हणेल तें खरें होईल असा तो निष्णात ज्योतिषी असतो. तो शिल्पकलेंत निपुण व पाकशास्त्रांत प्रवीण असतो. अथर्ववेदांतील जादूमंत्रांचा तो तज्ज्ञ असतो. कामशास्त्रांत तो बाकी कांहींच ठेवीत नाहीं. भारताचा अभ्यास त्यानें पुरा केलेला असतो, आगम आत्मसात् केलेले असतात. नीतिशास्त्रांतील सर्व वाद त्यास अवगत असतात, वैद्यकांत त्याची गति असते, काव्य–नाटकांत तर त्याच्या बरोबरीचा कोणीहि नसतो. तो स्मृतींची चर्चा करतो. गारुड्याच्या कलेचें मर्म जाणतो, निघंटांत तर पूर्ण विशारद असतो व व्याकरणांत चोख आणि तर्कांत गाढा विद्वान असतो. या सर्व शास्त्रांत तो प्रवीण असून आत्मज्ञानांत तेवढा तो पूर्ण जन्मांध असतो. मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या मुलास पाहिल्यास मृत्यु येतो म्हणून त्यास पाहूं नये, त्याप्रमाणें अशा मनुष्याचेंहि

तोंड पाहूं नये. मोराच्या अंगभर असलेल्या सर्व पिसांना डोळे असतात, परंतु एकासहि पाहण्याची शक्ति नसते, त्याप्रमाणें एका अध्यात्मज्ञानावांचून हीं सर्व शास्त्रें व्यर्थ व अप्रमाण होत. अशा मनुष्याचा देह म्हणजे अज्ञानाचें बीज होय व अशा बीजापासून अज्ञानरूपीच वृक्ष, फुलें व फळें निर्माण होणार!"

## दैवी संपत्ति : १

वर तेराव्या अध्यायांत विस्तृतपणें दिलेले विविध सद्गुण व तद्विरोधी दुर्गुण यांचें सूक्ष्म पृथक्करणात्मक विवेचन हा श्रीज्ञानेश्वरांचा 'अंतरंगींचे तत्त्वज्ञ' या दृष्टीनें अवर्णनीय विशेष आहे हें आपण पाहिलें. सोळाव्या अध्यायांत पुन्हा विषयाचें विवेचन निराळ्या मथळ्याखालीं आलें आहे. तेथें परंपरागत व उपजत असलेल्या अशा दोन प्रकारच्या–दैवी व आसुरी संपत्तींचें–वर्णन दिलें आहे. दैवी संपत्ति म्हणजे सद्गुणांची संपत्ति व आसुरी संपत्ति म्हणजे दुर्गुणांचा समुच्चय होय. आतां दैवी संपत्तींत कोणत्या सद्गुणांचा समावेश होतो तें पाहूं. या सर्व सद्गुण–समुच्चयांत अभयास श्रेष्ठ स्थान मिळतें. कर्माकर्मांचा अहंकार नाहींसा झाल्यामुळें संसाराची भीति सांडणें यासच निर्भयता म्हणावें. अथवा ऐक्यभावाचा इतका विस्तार व्हावा कीं त्यामुळें दुसराहि आत्मरूप होऊन भयाची वार्ता देखील देशोधडीस जावी. हेंहि एक प्रकारचें अभयच होय. पाणी मिठास बुडवावयास गेलें तर मीठच पाणी होतें, त्याप्रमाणें आपण अद्वैत झाल्यावर भयाचा तावडतोब नाश होतो. दैवी संपत्तींतील दुसरा सद्गुण म्हणजे सत्त्वशुद्धि होय. वर्षाऋतूच्या आधीं व ग्रीष्म ऋतूनंतर गंगेचें पाणी जसें निर्मळ व स्वच्छ असतें, त्याप्रमाणें आपलें अंतःकरण ठेवणें म्हणजेच सत्त्वशुद्धि. आपला वल्लभ दूर देशीं गेला असतां विरहक्षोभानें पतिव्रतेस हानिलाभाचा विचारहि शिवत नाहीं; तद्वत् इंद्रियवर्गानें मन विचलित न होऊं देतां बुद्धि सत्स्वरूपांत आनंदानें लीन व एकरूप करणें म्हणजेच सत्त्वशुद्धि होय. स्थिरता हा ज्ञानयोगांतील तिसरा सद्गुण होय. त्यामुळें आत्मलाभाविषयीं तीव्र इच्छा उत्पन्न होते. या इच्छेमुळें अग्नींत निष्कामपणें आहुति द्यावी त्याप्रमाणें सगळ्या चित्तवृत्तींचा देवासाठीं त्याग करतां येतो. कुलीन गृहस्थ ज्याप्रमाणें आपली कन्या निरपेक्षपणें सत्कुळीं जन्मलेल्या वरास देतो, त्याप्रमाणें मनुष्यानें निर्विकल्पपणें योगज्ञानांत स्थिर व्हावें. रस्त्यावरील वृक्ष ज्याप्रमाणें छाया, पत्र, पुष्प, फल हीं सर्व वाटसरूंस द्यावयास चुकत नाहीं, त्याप्रमाणें मन, धन इत्यादि आपल्याजवळ असलेलें सर्व श्रमलेल्यांच्या उपयोगासाठीं आनंदानें देणें म्हणजे खरें दान होय. गढूळ पाण्यांतील गढूळपणा निवळीच्या बियांनीं काढून टाकावा, त्याप्रमाणें इंद्रियांना विषयांपासून तोडून दूर ठेवणें म्हणजेच दम होय. इंद्रियांवर विषयांचा ताबा चालूं नये, म्हणून त्यांना

एकत्र बांधून संयमाच्या स्वाधीन करावें. दाही इंद्रियें वैराग्य-अग्नीनें भरणें व श्वासोच्छ्वासागणिक देहास व्रतें आचरावयास लावणें म्हणजेच दम होय.

यापुढील सद्गुण म्हणजे यज्ञ. आपल्याजवळ जें सर्वांत उत्तम असेल ते विधिपूर्वक परमात्म्यास अर्पण करणें म्हणजे यज्ञ होय. ब्राह्मणानें षट्कर्मैं केलीं व त्यास क्षुद्रानें नमस्कार केला, तर दोघांनाहि योगफल सारखेंच मिळते. आपापलीं कर्तव्यें योग्य प्रकारें बजावणें म्हणजेच अधिकारपरत्वें यज्ञ करण्यासारखें आहे व म्हणून यज्ञ सर्वांसच करतां येतो. मात्र फलाशेच्या विषाची बाधा तेवढी होऊं देऊं नये. चेंडू जमिनीवर आपटावयाचा तो जमिनीस हाणण्यासाठीं नव्हे, तर परत झेलण्यासाठीं. बीज जमिनींत पेरायचें तें तेथेंच राहूं देण्यासाठीं नव्हे, तर पीक काढण्यासाठीं. आरसा पुसून साफ करावयाचा तो आपलें प्रतिबिंब स्वच्छ दिसावें म्हणून. त्याप्रमाणें सर्व शास्त्रांचा अभ्यास केवळ त्या शास्त्रांच्या ज्ञानासाठीं करावयाचा नसून ईश्वर प्राप्तीसाठीं करावयाचा असतो. ब्राह्मणानें ब्रह्मसूत्रांचा अभ्यास करावा, दुसऱ्यांनीं स्तोत्रें म्हणावीं किंवा देवाचें नामस्मरण करावें. परमेश्वर प्राप्तीसाठीं यापैकीं कोणत्याहि गोष्टींचा अवलंब करणें म्हणजेच स्वाध्याय होय. अग्नींत धूप जळतो, शुद्धीकरणानें सोन्याचें वजन कमी होतें किंवा कृष्ण पक्षांत चंद्राचा क्षय होतो, त्याप्रमाणें स्वरूप-प्राप्तीकरतां शरीराची व प्राणांची आटणी करणें यालाच तप म्हणतात."

## दैवी संपत्ति : २

आतां दैवी संपत्तीच्या दुसऱ्या गुणसमुच्चयाचें वर्णन श्रीज्ञानेश्वर करतात. "दूध जसें सर्व बालकांना सारखेंच हितकारक असतें किंवा चैतन्य जसें सर्व भूतमात्रांत सारखेंच असतें, त्याप्रमाणें सर्व प्राणिमात्रांशीं मैत्री असणें म्हणजेच आर्जव किंवा सरळपणा होय. तसेंच जगाचें हित व्हावें या उद्देशानें शरीर-वाचा-मनांनीं वागणें म्हणजेच अहिंसा होय. सत्य जाईच्या कळीप्रमाणें अणकुचीदार पण मृदु व चंद्रप्रकाशाप्रमाणें शुभ्र पण शीतल असतें; किंवा रुचीला कडू मुळींच नाहीं, परंतु पाहतां क्षणींच रोगाचा नाश करणाऱ्या औषधाप्रमाणें सत्य असतें. असें औषध उपलब्ध नाहीं म्हणून सत्य निरुपमेय आहे. पाणी पर्वताचे कडे फोडतें; परंतु डोळा आंत बुडविला तरी डोळ्यास मुळींच खुपत नाहीं, त्याप्रमाणें सत्य आहे. संशय नाहींसे करण्याच्या कामीं सत्य लोखंडापेक्षां तीक्ष्ण व कठीण असतें; ऐकतांना मूर्तिमंत माधुर्यालाहि तें मागें सारतें. तें प्रिय असून कोणास फसवीत नाहीं व यथार्थ असून कोणास खुपत नाहीं. याउलट, पारध्याचें गाणें गोड असतें, तथापि तें हरणास प्राणघातक ठरतें! कानाला मधुर, पण अर्थ पाहूं गेलें असतां जें काळीज भेदतें तें राक्षसणींचें सुंदर गायन घेऊन काय जाळावयाचें? सत्य आईच्या बोलण्याप्रमाणें बाह्यतः कडक पण वस्तुतः फुलाप्रमाणें मृदु, निर्विकार व कर्णमधुर असतें. अक्रोधत्व हा एक

अंतःकरणाचा गुण आहे. दगडावर पाणी ओतलें तरी त्यास अंकुर फुटत नाहीं; सापाच्या कांतेवर पाय दिला तरी तो कांहीं फणा उभारीत नाहीं; वसंत ऋतूंतदेखील आकाशास फुलें येत नाहींत; रंभेच्या रूपामुळेंदेखील शुकामध्यें कामवासना जागृत झाली नाहीं; राखेत कितीहि तूप ओतलें तरी अग्नि प्रदीत होत नाहीं; या प्रकारच्या मनःस्थितीस अक्रोधत्त्व हें नांव आहे. बुद्धीच्या सहाय्यानें देहाचा अभिमान सोडून सर्व जगांतील वस्तूंचा संबंध सोडणें याला त्याग म्हणावें. प्रलयकालाच्या पाण्याला पूर येऊन त्यांत सर्व विश्वासाचा विस्तार नाहींसा झाल्यावर उगम पावणें, वाहणें व समुद्रास मिळणें हे भेद रहात नाहींत व चोहोंकडे पाणीच पाणी होतें, त्याप्रमाणे ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान ही त्रिपुटी नाहींशी झाल्यावर बाकी जें केवळ ज्ञान उरतें त्यास शान्ति म्हणावें. आतां, अपैशुन्य ( दुष्टपणाचा अभाव ) म्हणजे काय तें ऐक. रोगग्रस्त लोक उपचारासाठीं आले असतां चांगला वैद्य त्यांच्यात आपपर–भेद करीत नाहीं. चिखलांत रुतलेल्या गाईच्या क्लेशानें जो कासावीस होतो, तो ती दुभती आहे कीं भाकड आहे हें न पाहतां तिला मुक्त करतो. किंवा बुडत्याला दयेनें पाण्यांतून बाहेर काढण्यासाठीं पाण्यांत उडी मारणारा बुडणारी व्यक्ति ब्राह्मण आहे का अंत्यज आहे हें न पाहतां बुडत्याचे प्राण वांचवितो. एखाद्या पतिव्रता स्त्रीस दुष्ट लोकांनी उघडी केली तर सभ्य लोक तिला नेसविल्यावीण पाहात नाहींत. त्याप्रमाणें दुसऱ्यांचे दोष आपल्या नजरेस पडले तर आधीं झांकून मग त्यांच्याकडे पाहावें. पुजून देवास पाहावें; पेरून शेतास जावें;, आदरसत्कारानें संतोषवून अतिथीचें आशीर्वाद घ्यावे. त्याप्रमाणेंच आपल्या गुणांनीं दुसऱ्याचें उणें फेडून मग त्याच्याकडे पाहावें. हीं सर्व चांगुलपणाचीं लक्षणें होत. आतां **दया.** ती चंद्रप्रकाशासारखी आहे. आपल्या शीतल प्रकाशानें निववितांना ती लहानथोर हा भेद मानीत नाहीं. आपल्या स्वतःचा नाश करून घेऊन गवतास जगविणाऱ्या पाण्याइतकी दयापूर्ण वस्तु जगांत दुसरी नाहीं. त्याप्रमाणें, दुसऱ्यांच्या दुःखानें कळवळून आपल्या सर्वस्वाचा त्याग केला, तरी आपण कांहींच केलें नाहीं असें मानावें. पायांत कांटा बोचला तर सर्व शरिरास दुःख होतें, त्याप्रमाणें दुसऱ्याच्या दुःखानें आपण दुःखी व्हावें; तळपायास तेल चोळले तर डोळे थंड होतात, त्याप्रमाणें दुसऱ्याच्या सुखानें आपण आनंदी व्हावें. तहान लागलेल्यांना तृप्त करण्यासाठीं पाणी उत्पन्न केलें आहे, त्याप्रमाणें दुःखितांचें दुःख निवारण्यासाठींच जणुं जो जन्मला आहे, तो मूर्तिमंत दयाच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां अलोलुपत्व. हा गुण सूर्यासारखा आहे. कमळ सूर्यास अनुसरत असलें तरी कमळाच्या सौंदर्यास सूर्य शिवत नाहीं किंवा वसंत येतांच वनश्रीची शोभा वाढते, परंतु तो मात्र तिचा मुळींच उपभोग घेत नाहीं; सर्व मोठमोठ्या सिद्धींसह लक्ष्मी जरी जवळ आली तरी विष्णु तिची पर्वा करीत नाहीं, त्याप्रमाणें इहलोकींची

किंवा परलोकींचीं सर्वं इंद्रियजन्य सुखें जरी पायाशीं लोळत आलीं तरी त्यांचा उपभोग घ्यावा हें अलिप्त मनुष्याच्या मनांतहि येत नाहीं! मधमाशा मोहोळास स्पर्श करतात, जलचर पाण्यांत पोहोतात किंवा पक्षी आकाशांत उडतात, त्याप्रमाणें मार्दव हा गुण आहे. बालकावरचें मातेचें प्रेम अगदीं कोमल असतें. वसंत ऋतूंत मलयानिलाचा स्पर्श फार मऊ असतो. प्रियतमेची भेट डोळ्यांस फार मृदु असते. कापूर हातास फार मऊ लागतो आणि दिसावयास शुभ्र व चकचकीत असतो; तो वाटेल तितका खाण्यामुळें बाधा झाली नसती, तर कापूर मार्दवाचें उपमेय म्हणून सर्वांत श्रेष्ठ ठरला असता! महाभूतांमध्यें, त्याचप्रमाणें सूक्ष्म परमाणूंच्या पोटीं शिरणाऱ्या आकाशाप्रमाणें मनुष्यानें मृदु असावें. सुंदर मनुष्यास कोड उत्पन्न झालें किंवा संभावितावर आळ आला, तर त्यास प्राणसंकट आल्याप्रमाणें जें वाटतें, ती ऱ्ही म्हणजे लाज होय. फिरफिरून जन्मास यावयाचें व मरावयाचें आणि जिवंतपणीं शव होऊन राहावयाचें यांत कांहीं अर्थ नाहीं, असा विचार म्हणजेच लाज! मल–मूत्र–रक्तादिकांनीं मिश्रित अशा दुर्गंधी रसानीं भरलेल्या गर्भाशयांत पुनः पुनः जन्मास येणें व पुनः पुनः मरणें हें अत्यंत लाजिरवाणें नाहीं काय? देह धारण करून नामरूपास येणें हें देखील अत्यंत लज्जास्पद होय. **अचापल्य** अर्थात् चंचलतेचा अभाव म्हणजे कळसूत्री बाहुलीप्रमाणें आंतील सूत्र तोडतांच हातपाय न हलवितां निश्चेष्ट राहणें होय. प्राणजयानें इंद्रियांवर आपला ताबा पुनः बसवावा. सूर्य मावळला म्हणजे त्याचीं किरणें त्यांत लुप्त होतात, त्याप्रमाणें मनावर जय मिळविला कीं सर्वं इंद्रियें मनांत मिसळून एकरूप होतात. मनावर व प्राणांवर विजय मिळविला कीं इंद्रियें दीन व बलहीन होतात. ही इंद्रियांची बलहीनता म्हणजेच अचापल्य होय."

## दैवी संपत्ति : ३

भगवद्गीतेंतील आणखी कांहीं श्लोकांत दिलेल्या दैवी संपत्तीचें वर्णन श्रीज्ञानेश्वरांनीं केलें आहे. हा तिसरा सद्गुण–समुच्चय होय. आध्यात्मिक तेज हा एक सद्गुण आहे. याच्यामुळें योगमार्गानें ईश्वर–प्राप्तीसाठीं प्रयत्न करीत असतां धैर्यांत मुळींच न्यूनता पडत नाहीं. प्राणेश्वरासाठीं जीव देणाऱ्या सतीस अग्निप्रवेश करतांना मृत्यु आला तरी त्याची पर्वा नसते. साधक ईश्वर–प्राप्तीसाठीं सहज व निश्चयानें प्रयत्न करीत असतां त्याच्या आड विधिनिषेध किंवा महासिद्धी या आध्यात्मिक तेजामुळें येऊं शकत नाहींत. देहास त्यावर वाढणाऱ्या केसांबद्दल कांहीं वाटत नाहीं, त्याप्रमाणें अनेक आपत्ती सोसूनहि आलेल्या मोठेपणाचा गर्व न वाटणें यालाच सहिष्णुता म्हणावें. इंद्रियें उच्छृंखल झालीं असतां त्यांचा तीव्र वेग थोपवून धरणें आणि प्रारब्धानें दुर्धर रोग जडल किंवा प्रिय वस्तूंचा वा माणसांचा वियोग झाला असतां तो शांतपणें सहन करणें यास धैर्य

म्हणतात. या सर्व आपत्तींचा पूर एकाच वेळीं त्याच्यावर लोटला तरीहि तो त्यास अगस्त्य ऋषींपेक्षां जास्त धैर्यानें तोंड देतो. आकाशांत धुराचा लोट उठला तरी त्यास वाऱ्याची झुळूक सहज गिळून टाकते, त्याप्रमाणें आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक सर्व आपत्ती त्याच्यावर एकदम कोसळल्या तरी त्या सर्व तो गिळून टाकतो व चित्तक्षोभाच्या अतिशय कठीण प्रसंगींहि आपल्या मनाची समता कायम ठेवतो. आतां पावित्र्य. हें बाहेरून स्वच्छ घांसलेल्या व आंत पवित्र गंगेचें पाणी भरलेल्या शुद्ध सोन्याच्या कळशी-प्रमाणें असतें. शरीरानें निष्काम कर्में करायचीं व अंतःकरणांत पूर्ण विवेक बाणूं द्यावयाचा, हेंच मूर्तिमंत पावित्र्य. **अद्रोहत्व** किंवा सर्वांविषयीं प्रेम हें पवित्र गंगेच्या पाण्यासारखें असतें; गंगेचें पाणी लोकांचें पाप व त्यांचा ताप नष्ट करीत व तीरावरील वृक्षांना पोशीत समुद्रास जाऊन मिळतें; सूर्य जगाचा आंधळेपणा नाहींसा करीत व तेजाचीं मंदिरें उघडीत विश्वाची प्रदक्षिणा करावयास निघतो; त्याप्रमाणें अद्रोही मनुष्य बद्धांना मुक्त करतो, बुडत्यांना तारतो व आर्तांचीं संकटें नाहींशीं करतो. मानव्याचें हित व त्याची उन्नति साधण्यासाठीं रात्रंदिवस प्रयत्न करणें हें त्याचें मुख्य ध्येय असून तें प्राप्त करून घेत असतां सहज आपलेंहि हित साधतां आलें तर तो साधतो. परंतु ज्यामुळें प्राणिमात्रांचें अहित होईल अशी गोष्ट आपल्या स्वार्थासाठीं तो करील हे मात्र मुळींच संभवत नाहीं. शंभूच्या डोक्यावर येऊन बसतांना गंगा जशी संकोच पावते, त्याप्रमाणें मान्यता मिळाली असतां संकोच पावणें म्हणजेच अमानित्व होय. वर विस्तृतपणें वीणलेले सव्वीस सद्‌गुण म्हणजेच मोक्षसंपत्ति मिळविण्याची संपूर्ण तयारी असें श्रीज्ञानेश्वर सांगतात. हे सद्‌गुण म्हणजे सव्वीस फुलांची माळ असून ती ‘ मुक्ति ’—वधू आपल्या हातांत घेऊन निरपेक्ष “ वैराग्य ” वराच्या गळ्यांत घालण्यास निघाली आहे ! किंवा ही सव्वीस वातींची ज्योत पेटवून श्रीगीतादेवी आपला पति जो आत्मदेव त्याला आरती ओंवाळण्याला आली आहे ! किंवा हे सव्वीस सद्‌गुण म्हणजे गीतासागरांतील दैवी संपत्तीच्या शिंपल्यांत सांपडलेले सव्वीस सुढाळ मोतीच आहेत ! ”

### आसुरी संपत्ति : ४


आसुरी संपत्तींत ज्या दुर्गुणांचा समावेश केला आहे त्यांचें क्रमशः वर्णन ज्ञानेश्वरांनीं यापुढें दिलें आहे. हे दुर्गुण सहा आहेत : दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरता व अज्ञान. गुरूनें दिलेली विद्या चव्हाट्यावर आणली, तर ती वस्तुतः इष्ट फल देणारी असली तरी घातक होते. पुरांतून पैलतीरीं नेणें हें नावेचें काम; परंतु तीच नाव जर मनुष्याच्या डोक्यास बांधली तर ती त्यास खास बुडविते; त्याप्रमाणें जो दिसेल त्यापुढें आपल्या परोपकार—कृत्याची व धर्माची टिमकी वाजविली तर तो तारणारा धर्म नाशास कारण होतो. दर्प हा चाबुकस्वाराच्या

घोड्याप्रमाणें असतो; तो इंद्राच्या ऐरावतीलाहि आपल्यापेक्षां हीन लेखतो ! किंवा तो कुंपणावरील सरड्याप्रमाणें असतो; या सरड्यास कांटेरी कुंपणच स्वर्गापेक्षांहि श्रेष्ठ वाटतें ! काडीस लागलेली आग उगीचच आकाश गवसूं पाहते व डबक्यांतील मासा समुद्रास तुच्छ मानतो, त्याप्रमाणें गर्विष्ठ मनुष्यास आपली स्त्री, विद्या, स्तुति, आपलें धन किंवा आपली प्रतिष्ठा यांचा अभिमान वाटतो. थोडा वेळ आपल्यावर ढगाची छाया आहे हें पाहून मूर्ख मनुष्यानें आपलें घर पाडावें किंवा मृगजळ पाहून पाण्याचें तळें फोडावें, त्याप्रमाणें दर्पयुक्त म[illegible] वर्तन असतें. पतंगाला दिवा आवडत नाहीं. काजव्यानें सूर्यास मागें टाकण्याचा प्रयत्न करावा किंवा टिटवीनें समुद्राशीं वर करावें, त्याप्रमाणें **अभिमाना**च्या मोहानें मनुष्यास ईश्वराचें नांवसुद्धां सहन होत नाहीं. तो वडिलांसहि आपला प्रतिस्पर्धी मानतो. हा मूर्तिमंत रौरव नरकाचा मार्ग होय. **क्रोधाशील** मनुष्यास दुसऱ्याचें सुख पाहवत नाहीं. तें सुखच त्याचा क्रोधाग्नि भडकविण्यास कारण होतें. उकळत्यास तेलांत पाण्याचे थेंब टाकल्यानें जास्तच भडका उडतो; चंद्रप्रकाश पाहून कोल्हा पोटांत जळफळतो; ज्याच्या उदयानें विश्वाचें आयुष्य उजळतें तोच सूर्य प्रातःकाळीं उगवला कीं पापी घुबडाचे मात्र डोळे फुटतात; जगाला दुखविणारी पहांट चोराला मात्र मरणापेक्षांहि त्रासदायक वाटते; सापाच्या पोटांत गेलेल्या दुधाचें जहरी विषच बनतें किंवा समुद्रांत पेटलेला वडवाग्नि अगाध पाणी शोषूनहि पुनः जास्तच प्रदीप्त होतो; त्याप्रमाणें दुसऱ्यची विद्या, दुसऱ्याचें शहाणपण वा दुसऱ्याचें वैभव पाहून रागीट मनुष्याचा राग दुणावतो ! कठोर मनुष्याचें मन सापाच्या बिळाप्रमाणें असतें, त्याची दृष्टि म्हणजे बाणांचा वर्षाव, त्याचें बोलणें म्हणजे निखाऱ्यांची वृष्टि व त्याची कृति पोलादी करवताप्रमाणें तीक्ष्ण व बोंचक असते. अज्ञानी मनुष्य दगडाप्रमाणें असतो; दगडास थंडी व उष्णता कळत नाहींत. जात्यंधाप्रमाणें त्यास दिवस व रात्र यांतील भेदहि कळत नाहीं. तो पळीप्रमाणें अनेक पदार्थांत फिरूनहि कोणत्याच पदार्थाचा रस चाखूं शकत नाहीं, म्हणून तो जाणतहि नाहीं. तान्ह्या मुलाप्रमाणें चांगलें किंवा वाईट हा भेद न जाणतां तो सर्वच आपल्या तोंडांत टाकतो. पाप-पुण्याची खिचडी केल्यामुळें त्यांचे परिणाम त्यास कळत नाहींत." (ज्ञा., १६, २१७-२५२.) ह्या सहा दुर्गुणांनीं संपूर्ण आसुरी संपत्ति बनते. साप लहान असला तरी त्याचें विष भयंकर असतें. हे सहा दुर्गुण म्हणजे एकाच रात्रींत जमलेला जणुं सहा क्रूर ग्रहांचा समुदायच ! मरणोन्मुखाच्या अंगांत सर्वच रोग शिरावे, वाईट मुहूर्तावर सर्वच कुयोग जमावे किंवा शेळी मरत असतां तिला सात नाग्यांच्या इंगळीनें चावावें, त्याप्रमाणें परमार्थ विसरून संसारांत बुडणाऱ्याच्या अंगीं हे सर्व सहा दोष एकदम शिरतात; त्याची

सारखी अवनति होत जाते व तो हीन योनींत जन्मतो किंवा एखादा दगड होऊन पडतो. " (ज्ञा., १६, २५३–२६३.) " जे आसुरी संपत्तीमुळें ईश्वराशीं विरोध करतात ते मूढ लोक अत्यंत अधम योनींत जन्मतात व ही हीन योनि म्हणजे क्लेशरूपी गांवाचा जणुं उकिरडा किंवा संसारपुरीचा पाणवठा म्हणजे घाण पाणी सांचण्याची जागाच होय. ते वाघ किंवा विंचू अशा दुष्ट योनींत जन्मतात व त्यांना खावयास अन्न मिळत नाहीं. भूकनें अतिशय व्याकुळ झाले म्हणजे ते आपल्याच अंगाचे लचके तोडून खातात किंवा बिळांत कोंडलल्या सापाप्रमाणें ते आपल्याच विषानें देह जाळून टाकतात ! श्वास बाहेर टाकण्यासहि त्यांना निश्रांति मिळत नाहीं. अशा क्लेशमय योनींत त्याला युगानुयुगें राहावें लागतें. ते मूर्तिमंत अंधःकार बनतात व या अंधारामुळें जास्त काळवंडतात. त्यांना पाहून पापहि भयानें थरारतें; नरकासहि त्यांची भीति वाटते; तापहि तापतो व त्यांच्यामुळें मळहि जास्त पापी होतो व विटाळहि जास्त विटाळतो. त्यांच्या निकृष्ट व पापी अवस्थेचें वर्णन करतांना वाचा अडखळते व मन कचरतें. काय ही नरकवासाची जोड या मूर्खांनीं करून घेतली ! ज्या आसुरी मार्गामुळें यांना हें घोर पतन प्राप्त झालें तो यांनीं आपण होऊन कां पत्करला ? "

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :— DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील

छबिलदास रोड, दादर (W. R.),

# महंत आत्मारामबुवा रामदासी

*****************************************

महाराष्ट्रांतील कोकण प्रांत हा पूर्वीपासून द्रव्यदृष्ट्या गरीब असला तरी बुद्धिमत्तेंत श्रेष्ठत्व पावलेला आहे. राजकारणी, मुत्सद्दी व विद्वान् देशभक्त यांप्रमाणेंच संत व सत्पुरुष यांची मालिकाही ह्या भूमींत सतत चाललेली दिसून येते.

दाक्षिण कोकणांतील विजयदुर्ग–राजापूरच्या बाजुला 'वासिष्ठ गोत्री' पळसुले या उपनांवाचीं कांहीं कऱ्हाडे ब्राह्मणांचीं कुटुंबें आहेत. अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांत (सन १७४६ च्या सुमारास) आत्माराम नांवाचा एक मुलगा तिथल्या एका गरीब पण सात्विक कुटुंबांत जन्मला. "शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टाभिजायते।" या वचनाप्रमाणें पूर्वजन्मींचा कोणी योगीच या शुचिष्मंत कुळांत जन्मला असावा असें त्याच्या पुढच्या चरित्रावरून म्हणण्याला हरकत नाहीं. कारण या 'आत्मारामा'ची लहानपणापासूनच धर्माकडे प्रवृत्ति होती.

तत्कालीन रीतिरिवाजांप्रमाणें कांहीं वैदिक व संस्कृत अध्ययन झाल्यावर या बाल आत्मारामानें रामदासी सांप्रदायाची दीक्षा घेतली.

## श्रीशंकराचार्य आणि रामदास

हा रामदासी सांप्रदाय महाराष्ट्रांतील एक प्रमुख सांप्रदाय आहे आणि त्याची स्थापना सतराव्या शतकांत समर्थ श्रीरामदासस्वामींनीं केलेली आहे.

इ. सनाच्या सातव्या शतकांत आद्य श्रीशंकराचार्यांनीं वैदिक धर्माच्या पुनः-प्रस्थापनेचें जें कार्य केलें तशाच प्रकारचें कार्य सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत रामदासस्वामींनीं केलें. शंकराचार्यांना त्या वेळच्या बौद्ध सांप्रदायाला तोंड देऊन आणि वैदिक धर्मांत शिरलेले दोष काढून टाकून त्याला नवीन तजेला द्यावयाचा होता. हें कार्य त्यांनीं बौद्ध सांप्रदायांतील कित्येक तत्त्वें नि आचार यांचा स्वीकार करून बेमालून पार पाडलें. इतकें कीं, त्यामुळें बौद्ध धर्माचें नांवच भरतखंडांतून नाहींसें झालें. तत्कालीन कित्येक सनातनी वैदिकधर्मी लोक मात्र श्रीशंकराचार्यांना 'प्रच्छन्न बौद्ध' म्हणजे 'शबल' किंवा 'बाटगे वैदिकधर्मी संन्यासी' असें म्हणत असत!

श्रीरामदासस्वामींनीं महाराष्ट्रांत केलेलें कार्य याच स्वरूपाचें होतें. श्रीज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, इत्यादि त्यांच्या पूर्वींच्या संत मंडळींनीं महाराष्ट्रांत ज्या 'भागवत धर्मा'चा प्रसार केला होता त्यांतील कांहीं तत्त्वें बौद्धांच्या तत्वांप्रमाणेंच होतीं. 'जग हें

दुःखमय असून दुःखाचा परिहार वासनाक्षयानेंच होईल; वासना हेंच सर्व दुःखांचें मूळ आहे; तेव्हां ती वासनाच मारून टाकली कीं दुःख कशाला येईल ?' अशी त्यांची विचारसरणी होती. वासना मारून टाकावयाची म्हणजे 'प्रवृत्ति' व 'निवृत्ति' या धर्माचारांच्या पूर्वापार चालत आलेल्या दोन मार्गांपैकीं निवृत्तीला प्रथम श्रेणीचा मान द्यावयाचा हें उघडच आहे.

## श्रीरामदासांचें वैशिष्ट्य

श्रीरामदासस्वामींनीं पाहिलें कीं साऱ्या जनतेनेंच हा निवृत्तिमार्ग स्वीकारला तर आपलें प्राचीन भारत राष्ट्र काय किंवा महाराष्ट्र काय जगांतून नष्टच झाल्यासारखें होईल ! तत्कालीन समाजाचें सूक्ष्म निरीक्षण केल्यावर त्यांना आढळून आलें होतें कीं, भारतबाह्य परकी लोकांनीं भारतांत शिरून जिकडे तिकडे जो उच्छेद मांडला होता त्याचें आपल्या समाजांतील नेत्यांच्या विकृत धर्मकल्पनांत आहे. तेव्हां त्यांना 'प्रवृत्ति' व 'निवृत्ति' या दोन सनातन तत्त्वांची ज्यांत योग्य सांगड घातलेली आहे असा धर्म शिकविला पाहिजे.

'सर्वं खल्विदं ब्रह्म', 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' इत्यादि सिद्धान्त तत्त्वतः मान्य असले तरी ते आचरतांना मानव हा अपूर्ण आहे आणि 'जगन्मिथ्या' म्हणून अन्यायाचा प्रतिकार करण्याचें आपण सोडून दिलें तर श्रीकृष्णांनीं सांगितल्याप्रमाणें 'उत्सीदेयुरिमे लोकाः' या न्यायानें जगाचा संहारच होणार; तेव्हां आपला समाज व आपलें राष्ट्र टिकून रहावयाचें असेल तर त्याला त्याच्या सध्यांच्या मरगळलेल्या अवस्थेंतून बाहेर काढलें पाहिजे.

या हेतूनेंच त्यांनीं आपल्या कीर्तनप्रवचनांतून अध्यात्माच्या विवरणाबरोबरच "देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ॥" "आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ-विवेका ॥" इत्यादि उपदेश करून सारा समाज हालवून सोडला !

## महाराष्ट्रधर्म आणि रामदासी सांप्रदाय

श्रीरामदासस्वामींनीं प्रसृत केलेल्या या धर्मालाच पुढें महाराष्ट्रधर्म असें नांव पडलें आणि त्यांचा सांप्रदाय 'रामदासी सांप्रदाय' या नांवानें प्रसिद्धीस आला.

या महाराष्ट्रधर्माची तत्त्वेंही फार सोपीं, कोणाच्याही बुद्धीला सहज पटणारीं नि आचरणांत आणण्याला सुलभ अशींच आहेत. एका विद्वान लेखकानें याची चतुःसूत्री पुढीलप्रमाणें वर्णिली आहे—

(१) 'धरीं रे मना धीर, धाकासि सांडीं'

हें ह्या धर्माचें पहिलें सूत्र होय.

( २ ) 'यत्नाचा लोक भाग्याचा। यत्नेवीण दरिद्रता ॥' हें याचें दुसरें सूत्र होय.

( ३ ) शक्तीनें मिळती राज्यें। युक्तीनें पावती सुखें' हें त्याचें तिसरें सूत्र होय.

( ४ ) 'आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थ–विवेका। तेथें आळस करूं नका। विवेकी हो ॥' हें या धर्मांचें चौथें सूत्र आहे.

तात्पर्य, धर्म आणि व्यवहार यांची यथायोग्य सांगड हा या धर्मांचा विशेष आहे आणि तो स्वामींनीं "प्रपंच सोडूनि परमार्थ कराल। तेणें तुम्हीं कष्टी व्हाल ॥ प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुम्ही विवेकी ॥" ह्या शब्दांत स्पष्ट केला आहे. तत्कालीन बावचाळलेल्या आणि आडमार्गाला लागलेल्या समाजधुरीणावरही त्यांनीं चांगले कोरडे ओढून त्यांना योग्य मार्गावर आणण्याचे प्रयत्न केले होते. असो.

## छत्रपति आणि समर्थ

सुदैवानें याचवेळीं छत्रपति शिवाजीमहाराजांसारखा अवतारी पुरुष महाराष्ट्रांत निर्माण होऊन त्यानें तत्कालीन परकी जुलमी सत्तेच्या पाशांतून महाराष्ट्रालाच नव्हे तर अखिल भरतखंडाला मुक्त करण्याची—'हिंदवी स्वराज्य' स्थापन करण्याची प्रतिज्ञा केली होती. 'छत्रपति' नि 'समर्थ' म्हणजे शिवाजीमहाराज व रामदासस्वामी यांचें कार्य परस्परांना पोषक होऊन महाराष्ट्रांत स्वराज्याची स्थापना झाली हें इतिहासज्ञांना माहीत आहेच.

श्रीशंकराचार्यांनीं निर्माण किंवा पुनरुद्धार केलेल्या धर्माला पुढें 'हिंदुधर्म' हें नांव पडलें; तसेंच श्रीरामदासांनीं उपदेशिलेल्या धर्माला पुढें 'महाराष्ट्रधर्म' असें नांव पडलें हें वर सांगितलेंच आहे.

बुवांनीं जागोजाग या पंथानुसार धर्मप्रसाराचें कार्य सुरू केलें.

## मंदिराची पहिली व्यवस्था

बुवांबद्दल लोकांना फार आदर असल्यामुळें मंदिराच्या व्यवस्थेच्या खर्चाची त्यांना कधींच पंचाईत पडत नसे. पाठारे प्रभु समाज तर त्यांना मदत करण्यास सदैव तयार असेच. पण गुजराथेंतील बडोदें आणि कोकणांतील सावंतवाडी येथील कित्येक लोक आणि खुद्द तिथले राजे–संस्थानिकहि त्यांना मदत करीत.

मंदिरस्थापनेपासून पुढची ७।८ वर्षें मंदिराची सर्व व्यवस्था स्वतः बुवाच पहात असत. पुढें वृद्धावस्थेमुळें त्यांची प्रकृति खालावली तेव्हां मंदिराची पुढील व्यवस्था त्यांनीं एक पंचमंडळ नेमून त्याच्याकडे सोंपविली. या पंचमंडळांत वर सांगितलेले श्री लक्ष्मण हरिश्चंद्रजी ऊर्फ भाऊ रसूल हे मुख्य असून वासुदेव विश्वनाथ, काशीनाथ मोरोजी, बाळकृष्ण वासुदेवजी व राघोबा गोविंदजी हे इतर पंच ( ट्रस्टी ) होते.

## समाधि आणि तदनंतर

शेवटीं श्रावण व॥ ७ शके १७५८ ( २ सप्टेंबर सन १८३६ ) रोजीं बुवांनीं या राममंदिराच्या आवारांतच समाधि घेतली.

समाधीपूर्वी रामभाऊ पातोडेकर या नांवाचा एक मुलगा बुवांनीं दत्तक घेतला होता. हेतु मंदिराची व्यवस्था त्यानें चालवावी हाच होता. ट्रस्टींनींही या मुलालाच मंदिराचा व्यवस्थापक नेमिलें.


पुढें हे रामभाऊ सन १८४२ मध्यें निवर्तल्यावर त्यांचा मुलगा हरिबुवा यांच्याकडे ही व्यवस्था सोंपविण्यांत आली.

## आपलीं मंदिरें आणि मठ

आपल्या मंदिरांचा नि मठांचा इतिहास पाहिला तर त्यांच्या संस्थापकांच्या पश्चात् एक दोन पिढ्यांनंतर त्यांना स्वार्थ नि उदासीनता यांनीं ग्रासलेलें दिसतें. या संस्थांना देणग्या, इनामें नि उत्पन्नें मिळून त्या आर्थिक दृष्टया सुस्थित झालेल्या असल्या तर पुष्कळ वेळां मूळ संस्थापकांचा उद्देश बाजूला राहून त्यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वारस किंवा व्यवस्थापक यांच्यांत कलीचा प्रवेश होऊन तंटेबखेडे नि सरकार-दरबार झाल्याचीं अनेक उदाहरणें दिसून येतात.

## काळ्या रामाचें सुदैव

आत्मारामबुवांचें हें राममंदिरही याला प्रथम अपवाद नव्हतें. पण सुदैवानें वर सांगितलेल्या भाऊ रसूलसारखे गृहस्थ या देवस्थानच्या पंच मंडळींत असल्यामुळें त्यांनीं या देवस्थानच्या व्यवस्थेंत आलेले व्यत्यय धीमेपणानें व प्रसंगीं इंग्रजांच्या न्यायकोर्टांचा आश्रय करूनही दूर केले आणि त्यांच्या पश्चात्‌ही ज्या ज्या वेळीं या देवस्थानच्या व्यवस्थेबद्दल व मालकी हक्काबद्दल वाद माजले त्या त्या वेळीं कोणीना कोणी बुवांचे व देवस्थानचे भक्त पुढें होऊन ते वाद यशस्वीपणें जिंकीत गेले.



ह. भ. प. श्री. दासगणू महाराज

# महाराजांचा निखालस स्पष्टवक्तेपणा

**श्री साईबाबांचे एक निष्ठावान भक्त, कवि व सुप्रसिद्ध कीर्तनकार संत श्री दासगणू महाराज यांचा स्पष्टवक्तेपणा असामान्य कोटींतील होता. ते कोणाचीही भीड न बाळगतां जें अमंगळ व टीकास्पद दिसेल त्याच्यावर सडेतोड कोरडे ओढीत असत. कसें तें पहाः—**

१९१९ सालांतील गोष्ट. उपासनीबोवांनीं श्रीदासगणूंना कीर्तनासाठीं साकोरीस मुद्दाम बोलाविलें होतें. त्याप्रमाणें श्री. दामूअण्णा व श्री. किसनराव कासार या आपल्या दोन साथीदारांसह महाराज साकोरीस जाण्यास निघाले. श्रीदासगणू महाराजांच्या जिव्हाळ्याचीं शिरडीचीं शंभरसव्वाशें माणसेंहि त्यांच्यासवें साकोरीस गेलीं. कीर्तनामध्यें उपासनीबोवा समोरच बसले होते. त्यांना उद्देशूनच—

"नहंग तमारी रीत न हारी नंगेपन तुम छोडो जी"

आणि

"इनसान हो तुम प्यारे हैवान क्यों होते हो."

अशीं दोन नवीन पदें रचून कीर्तनांत म्हटलीं. तीं ऐकतांच उपासनीबोवा फार संतापले. अद्वातद्वा बोलूं लागले. 'हें कीर्तन बंद करा. नाहींतर भलतेंच होईल.' अशी शापवाणी उच्चारूं लागले. तेव्हां श्री. दुर्गाबाई म्हणून त्या वेळच्या उपासनीबोवांच्या पट्टशिष्या बोवांना शांत करीत म्हणाल्या, "महाराज, शांत व्हा. शांत व्हा. गणू ( दासगणू ) आपला आहे."

श्रीदासगणू यावर उसळून म्हणाले, "दुर्गाबाई, माझी रदबदली करण्याचें कांहींच कारण नाहीं. हे काय करणार असतील, तें करूं देत. काय होतें, तें मलाहि पाहावयाचें आहे. माझ्या अंगावर येऊन दोन हात करणार असतील तर त्यालाहि माझी हरकत नाहीं, पण उभें राहिलेलें कीर्तन मधेंच थांबणार नाहीं"

श्रीदासगणूमहाराजांच्या बरोबर शिरडीची बरीच मंडळी असल्यानें केवळ बोलाचाली पलीकडे विशेष प्रसंग आला नाहीं.

उपासनीमहाराज व दासगणूमहाराज यांची १९३५ सालीं शिरडीस रामनवमी उत्सवाचे वेळीं पुन्हां एकदां भेट झाली. त्यावेळीं घडलेलें वृत्त रामनवमीच्या इत्तिवृत्तांत श्रीदासगणू महाराजांनीं स्वतःच सविस्तर दिलें आहे. 'साईलीला' मासिकाच्या बाराव्या वर्षाच्या दहाव्या अंकांत पृष्ठ १४ वर प्रसिद्ध झालेला हा मजकूर श्रीदासगणू महाराजांच्या शब्दांतच असल्यानें जसाच्या तसाच पुढें देत आहे.

'यंदाच्या उत्सवांत एक विशेष गोष्ट झाली ती अशी कीं, साकोरी येथील उपासनीबोवा यांना दरसाल शिष्यशिष्यिणींसह उत्सवास येण्याबद्दल रीतीप्रमाणें आमंत्रण जात असतें; पण ते कधींहि उत्सवास आले नाहींत. चालू सालीं मात्र आपल्या कांहीं निवडक गणांसह एकादशीच्या दिवशीं सायंकाळीं आले. प्रथम ते दीक्षितांच्या वाड्यांत गेले. त्या ठिकाणीं श्री. माधवराव देशपांडे यांच्याबरोबर थोडें बोलून त्यांच्यासह श्रीसाईमहाराजांचे समाधीपाशीं आले. यावेळीं श्री. बाळासाहेब देव यांचं कीर्तन नुकतेंच संपलें होतें. मी मंदिरांतच होतों. त्यांनीं मला पाहून नमस्कार केला. मीहि त्यांना वारकरी पद्धतीप्रमाणें नमस्कार केला व म्हटलें, "मीं दरसाल आपणांस येण्याबद्दल पत्र पाठवीत असतों. पण आपलें येणें कधींच झालें नाहीं आणि या बारीला कां झालें?" त्यावर उपासनीबोवा म्हणाले कीं, "मीं तुमचें कीर्तन ऐकण्याकरितां मुद्दाम आलों आहें." मीं म्हटलें कीं, "माझें कीर्तन तुम्हांला पटणार नाहीं." तेव्हां ते म्हणाले, "छे! छे! तुमचें कीर्तन मला फार आवडतें. थोडा वेळ का होईना पण कीर्तन कराच." त्यानंतर मी कीर्तनास उभा राहिलों. श्रीएकनाथ चरित्रापैकीं त्यांचा शिष्य महाद्या महार या भागावर कीर्तन करून उपासनीबोवांच्या अश्लील, शास्त्रबाह्य व रिवाजाला विरुद्ध असलेल्या वर्तनाचा निषेध एका शास्त्रीबोवाची गोष्ट दृष्टान्तादाखल घेऊन केला. माझ्या निषेधाची जाणीव त्यांना ते धूर्त असल्यानें सहजच झाली. पुढें कीर्तनाचा समारोप करतांना स्पष्टच सांगितलें कीं, "आपण जर चांगलें वागलां असता तर किती चांगलें झालें असतें! अजून तरी आपण आपल्या वर्तनांत फरक करा. लोकांनीं निंदा करण्यासारखें कांहीं एक ठेवूं नका." पण, माझें हें म्हणणें त्यांना पटलेलें दिसलें नाहीं. कीर्तन संपल्यावर पुन्हा मी त्यांच्या पायां पडलों. हें माझें पायां पडणें, त्या वेळीं हजर असलेल्या कांहीं लोकांना पटलें नाहीं. त्याला माझा नाईलाज आहे. कारण या रामनवमीच्या उत्सवाची जबाबदारी माझ्यावर असल्यानें लोकरिवाजाप्रमाणें मला आलेल्या पाहुण्यांचें आदरातिथ्य करणें, जरूर असल्यानें त्याप्रमाणें मी केलें. उपासनीबोवा जातांना म्हणाले, "आतां साकोरीस येऊन असेंच कीर्तन करा. मला कीर्तन फार आवडतें!" मी म्हटलें, "सतरा वर्षांपूर्वी आपल्या बोलावण्यावरून साकोरीस कीर्तनाला आलों होतों. तेव्हां कीर्तनांत म्हटल्या गेलेल्या दोन पदांनीं आपला कोपाग्नि इतका भडकला कीं, आतां याचा परिणाम

काय होतो, अशी धास्ती लोकांना पडली; पण शिरडीचे शंभर सव्वाशें माणूस माझ्याबरोबर असल्यानें कांहीं एक न होतां मी सुखरूप परत आलों. तेव्हां आतां पुन्हा कशाला साकोरीला बोलावितां ? आपलें वर्तन चांगलें सुधारा. मग मी आपोआपच साकोरीस येईन. तुमचा आमचा तंटा थोडाच आहे ?”

इतकें बोलणें झाल्यावर उपासनीबोवा साकोरीस परत गेले. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं आपल्या कांहीं गणांकडून मला बोलावणें केलें, पण त्यावेळीं गणांनासुद्धां मी तेंच उत्तर देऊन वाटेस लाविलें. त्यानंतर माझ्याकडे कोणीहि आलें नाहीं.

श्रीउपानीबोवांवर महाराजांचा एवढा रोष असण्यास त्यांचें वागणें हें तर कारण आहेच, पण श्रीसाईबाबांचे भक्त असें स्वतःस म्हणविणाऱ्या या उपासनीबोवांनीं ‘साईवाक्सुधा’ या नांवानें प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांत तत्त्वज्ञानाच्या नांवाखालीं अत्यंत ओंगळ, अमंगळ, अश्लील असें लिखाण केलें आहे. त्याचा श्री दासगणू महाराजांना अतिशय तिटकारा आला. आणि मग ज्या ज्या वेळीं संधि मिळेल, त्या त्या वेळीं अगदीं कडक शब्दांत त्यांनीं त्यावर वरीलप्रमाणें फटके ओढले.

खऱ्या संतत्वाविषयीं श्रीदासगणू महाराजांच्या कल्पना अगदीं ठाम आहेत आणि त्यांनीं वेळोवेळीं काव्यरूपानें त्या प्रगटहि केल्या आहेत. निवडक अवतरणामध्यें उल्लेखिलेली ‘संत म्हणा त्याला’ आणि ‘तोचि म्हणावा जगीं संत’ हीं त्यांचीं दोन स्फुट पदें या दृष्टीनें अभ्यासण्यासारखीं आहेत. महाराज ज्या वेळीं टीका करतात, त्या वेळीं द्वेषबुद्धि खरोखरच नसते. संतत्वाची महति यथार्थपणें गात असतांना त्याशीं विपरीत वा विसंगत अशा आचारविचारांवर टीका करणें, त्यांना भाग होतें.

एकदां बैठकीमध्यें एका श्रोत्यानें त्यांना विचारलें, “[illegible]बोवा. परनिंदा करूं नये म्हणतात. मग आपण कीर्तनांत करतां, ती निंदा नाहीं [illegible]ण्यास

महाराज त्यावर हंसून म्हणाले, “असेलहि कदाचित्. पण त्याला माझा निरुपा[illegible]हे. मी बोलून चालून केरसुणी आहे. देवळें, देवघरें झाडून काढणें हें माझें काम. उगीच धूळ उडविणें चांगलें नाहीं, हें खरें. पण केर हा काढलाच पाहिजे ना ? देवाची पूजा करण्यास आरंभ करण्यापूर्वीं आपण देव्हारा झटकत नाहीं का ? त्याच भावनेनें मी बोलतों, टीका करतों.” श्रीसाईबाबांच्या स्तुतीपर रचलेल्या एका पद्यांत महाराज स्वतःविषयीं ‘अपने मशिदका झाड्डू गनू है’ असा उल्लेख करितात आणि हें पद प्रत्येक कीर्तनाच्या आरंभीं नमनाचें म्हणून म्हटलें जातें. यावरून टीका करण्याच्या पद्धतीमागची महाराजांची भूमिका स्पष्ट होईल.

संतत्वाचीं खरीं लक्षण सागत असतांना श्रीदासगणू महाराजांनीं अगदीं चोख धारवाडी कांटा वापरला आहे. किंवा अगदीं यथार्थ उदाहरण

द्यावयाचें झालें तर ज्यावर हिऱ्यांचा चव ठरविला जातो असा जवाहिऱ्याचा कांटा ते वापरतात, म्हटलें तरी चालेल. पासंगांतील अगदीं सूक्ष्म फरकहि त्यावर नोंदला जातो. गोजीवन श्री चौंडेमहाराज हे श्रीदासगणूंचे जिवलग स्नेही आहेत. परस्परांची गांठ घेतल्यावांचून त्यांना चैन पडत नाहीं. पुण्याच्या मुक्कामांत दोन चारदां तरी भेट होऊन विचारांची देवघेव व्हावयाचीच. या दोघांचा परस्पर प्रेमादर किती उत्कट आहे, तें दोघांच्या परिवारांतील लोकांना चांगलें माहीत आहे. श्री चौंडेमहाराजांविषयीं वाटणारा आदर श्रीदासगणूंनीं 'भक्तिसारामृत' या ग्रंथांत त्रेसष्टाव्या अध्यायांत भक्तिमार्गांतील थोर सज्जनांचीं नांवें उल्लेखितांना सर्वारंभीं पुढील ओव्यांतून प्रगट केला आहे.

"चौंडेबोवा कृष्णातिरीं । गोरक्षणाचा कैवारी ।
श्रद्धा दासबोधावरी । जयाची ती अनुपम ।
वैराग्य ज्याचें कडकडीत । देह गोरक्षणा प्रीत्यर्थ ।
लावून स्वखून स्वरूप सांप्रदायाप्रत । चालबिती श्रीसमर्थांच्या ।
सज्जनगडीं पालख्यांचा । सोहळा वाढविला यांनींच साचा ]
परम दयाळू मनाचा ! नमन माझें तयास ।"

चौंडे महाराजांचें कार्य जें गोरक्षण त्याविषयींहि महाराजांना किती जिव्हाळा आहे, तें तद्विषयक अनेक ठिकाणच्या उल्लेखांवरून सहज प्रत्ययास येतें. गोदामाहात्म्यांतील कांहीं ओव्या उदाहरणार्थ पाहण्यासारख्या आहेत.

"पहा श्रोते गोधनाची । किंमत केवढी थोर साची । उन्नती व्हावया राष्ट्राची । गोधनाची आवश्यकता ॥ धेनूस उपाशी ठेवून । जो भोजन करी ब्राह्मण । तयाचें तें अन्नसेवन ... क्षण समजावें ॥ करावया धेनुरक्षण । क्षत्रियांनीं वेचणें प्राण । गोछल ... गून । नृपें करावी जबर शिक्षा ॥ एवंच ही गाय । प्रत्येकानें मानणें माय । कांक प्रत्येकाचा पुष्ट काय । झाला हिच्याच दुग्धावरी ॥ माता शिशूंना जन्म देती । त्यांना धेनु संरक्षिती । ऐसें असून तयाप्रती । विकतां हाटीं पण काय ॥ रंजनावया धेनूस । पांवा वाजवी श्रीनिवास । ऐशा त्या पवित्र गोधनास । विकणें हाटीं बरें नव्हे ॥ क्षात्रकुलावतंस भूपती । श्रीशिवाजी छत्रपती । यांनीं गोधनाची जाणून महती । गोपालक म्हणवून घेतलें ॥ आतां हीच विज्ञप्ती । तुम्हां अवघ्या हिंदूप्रती । गोरक्षणाचा उबग चित्तीं ! येऊं न द्यावा बाप हो ॥"

चौंडे महाराज व त्यांचें कार्य याविषयीं आदर असूनहि महाराज ज्यावेळीं पुढील श्लोक लिहितात, त्यावेळीं त्यामागील हेतु नीट लक्षांत घेतला पाहिजे.

श्रीगाडगे महाराजांच्या कार्याविषयींहि श्रीदासगणू आदरानेंच बोलतात. पण तरीहि मुकुंदराय चरित्रामध्यें त्यांनीं हा श्लोक लिहिलाच आहे.

“ हा वर्गणी करून बांधित धर्मशाळा।
क्षेत्रांमधे दिन जनां उतरावयाला।
हा तो फलाहर करी न शिवेच अन्ना।
गोरक्षणा करित हा करी धूम्रपाना॥ ”

यावर भाष्य करितांना ते सांगत, गोरक्षण करणें, धर्मशाळा बांधणें हीं कृत्यें चांगलीं आहेत. समाजाच्या कल्याणासाठीं आणि सुखासाठीं त्यांचा उपयोग आहे, हें निःसंशय. पण संतत्वाचें कांहीं तें लक्षण होऊं शकत नाहीं. धर्मशाळा बांधणें, हें श्रीमंतांचें काम. गोरक्षण करणें हें राजसत्तेचें कर्तव्य. तें ते पाळीत नाहींत. म्हणून यांनीं समाजहिताचीं हीं कामें केलीं. चांगलें केलें. या श्लोकापुढच्याच कवितेच्या ओळींत श्रीदासगणू महाराज स्वतःचाच उल्लेख करितात—

“ हा आहे काव्यनिपुण, प्रेमळ बहु यत्कीर्तन।
हरिदिनीला करित गमन पंढरीस हा॥ ”


**श्री. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान** या साईभक्तांना श्रीदासगणू महाराजांच्या विषयीं फार आदर असे. मुकुंदरायांचें चरित्र ऐकल्यानंतर त्यांनीं श्रीदासगणू महाराजांना आग्रहानें विनंती केली कीं, आपण स्वतः-विषयींच्या या ओळी या आख्यांतून काढून टाका. परमेश्वराचें नांव आपल्या कीर्तनांत किती प्रेमळपणानें येतें, आपलें काव्य किती भक्तिरसपूर्ण आहे, अनेकांच्या हृदयाला त्यामुळें कसें समाधान लाभलें आहे, किती तरी लोक आपल्या कीर्तनामुळें परमार्थाकडे ओढले गेले आहेत; याची आपणांस नसली तरी मला चांगली कल्पना आहे. मग या ओळी उगीच कां लिहितां ? मला हें बरें वाटत नाहीं.” त्यावर दासगणू महाराजांनीं दिलेलें उत्तर मोठें विचार करण्यासारखें आहे. “ हे पहा मोरेश्वरराव, एकच प्याला नाटकांत बालगंधर्व अगदीं गहिंवरून रडतो, असें म्हणतात. त्याप्रमाणें कीर्तनांत माझ्या डोळ्यांना पाणी येतें. याला फार तर वर्ण्य विषयाशीं तन्मयता आली, असें म्हणतां येईल. संतत्वाची ती कसोटी कशी ठरेल ? कविता करणें हें तर त्या दृष्टीनें अगदींच कमी महत्त्वाचें. काव्यशक्तीचा संतत्वाशीं कांहीं अपरिहार्य संबंध नाहीं. या ओळी तुम्हांला बऱ्या वाटत नाहींत. इतर आणखी कोणाला रुचणार नाहींत. त्यांत कांहीं अर्थ नाहीं. मी लिहिलें तें अगदीं बरोबर आहे.”

कीर्तनप्रसंगीं श्रीदासगणू महाराजांच्या नयनांतून वाहणारा प्रेमाश्रूंचा प्रवाह आणि रंगभूमीवर अभिनयपटु नटाच्या डोळ्यांना येणारें पाणी यांत किती फरक आहे, तें विचारवंतांच्या ध्यानांत सहज येईल. पण संतांचीं लक्षणें सांगत असतां श्रीदासगणू महाराज किती सूक्ष्म विचारानें बोलतात, किती सावधपणा

बाळगतात, एखाद्या गोष्टीचा निर्णय घेतांना त्यांची विवेचक बुद्धि किती बारकावा करते; तें यावरून लक्षांत येतें.


महाराजांनीं केलेली ही टीका वेळप्रसंगीं कितीहि भेदक असली तरी ती 'पापात् निवारयति योजयते हिताय' या सहृद्भावनेनेंच केलेली असते. अंतःकरणांत द्वेष-मत्सराचा लवलेशहि कधीं असत नाहीं, हें त्यांच्या निकटवर्तियांना चांगलें ठाऊक आहे. त्यांच्या सर्ववत्सल हृदयाचा अनुभव आला नाहीं, असा संबंधीं माणूस विरळा.

—'संतकवि श्रीदासगणू महाराज' या श्री. अ. दा. आठवले लिखित चरित्रा-वरून साभार.




# जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.




प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# मला देव कसा भेटला?

—स्वामी शिवानंद

स्वामी शिवानंद ( हृषीकेश ) हे आधुनिक काळांतील एक सत्पुरुष होऊन गेले. ( १८८७–१९६३ ) वैद्य किंवा डॉक्टर यांचे कार्य म्हणजे शारीरिक व्याधीं-वर औषधोपचार करून माणसाला रोगमुक्त करावयाचें व त्याचे शरीरधर्म सुरळीतपणें चालू रहातील याबद्दल जरूर ती खबरदारी बाळगणें.

परंतु माणूस केवळ शारीरिक व्याधींनींच पिडलेला असतो असें नाहीं. त्याला मानसिक व्याधींनींहि ग्रासलेलें असतें. तें मानसिक दुःख कोणी दूर करायचें? एखादा वैद्य किंवा डॉक्टर जेव्हां मानवाच्या मानसिक आधिव्याधी दूर करण्यासाठीं पुढें सरसावतो तेव्हां त्याचें कौतुक करावें तेवढें थोडेंच असें वाटायला लागतें. खरें साधुत्व जंगलांत जाऊन तपश्चर्या करीत बसण्यांत नसतें तर मानवजातीची सर्व बाजूंनीं सेवा करण्यांत असतें.

स्वामी शिवानंद अशा थोर संतांपैकीं होते. हिमालयानजिक असलेलें हृषिकेश हें त्यांनीं आपलें पवित्र कार्यक्षेत्र ठरविलें व तेथें आपला आश्रमीय संसार थाटून त्यांनीं दुःखितांचें दुःख—मग तें मानसिक असो वा शारीरिक असो—दूर करण्यांत जीवनसाफल्य मानिलें.

तेथें हजारो लोकांना त्यांचें आकर्षण वाटलें व जे जे त्यांच्या सान्निध्यांत गेले त्यांनीं त्यांनीं आपलें कल्याण करून घेतलें. त्यांनीं स्थापन केलेल्या डिव्हाईन लाईफ सोसायटीचें मानव कल्याणाचें कार्य आजहि त्यांच्यामागें अखंड चालू आहे. स्वामी शिवानंदांचें मार्गदर्शन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें हजारो लोकांनीं मिळविलें व आपलें कल्याण करून घेतलें. मानवाचें अध्यात्मिक दृष्ट्या मार्गदर्शन करणारे लहानमोठे असंख्य ग्रंथ त्यांनीं लिहून ते लोककल्याणासाठीं प्रसिद्ध केले.

स्वामी शिवानंद यांनीं आपणास भगवंताची भेट कशी झाली यासंबंधींचा आपला अनुभव लिहून ठेविला आहे. तो साईलीलेच्या वाचकांसाठीं येथें सादर करण्यांत येत आहे.

" हिमालयांतील स्वर्गाश्रमांत राहून मी तपस्या करीत होतो. श्रद्धापूर्वक ध्यान-धारणेंत दिवसामागून दिवस खर्च करीत होतो. त्या भागांत असतां अनेक ऋषी

महर्षींना व तपस्वी लोकांना भेटण्याची मला संधी मिळाली. त्यांचे आशीर्वादहि मी मिळविले, आणि शेवटीं एके दिवशीं भगवंताचें दर्शन घडलें.

हें लिहिणें फार सोपें आहे; परंतु भगवंताचें दर्शन सुलभतेनें व सहजगत्या घडत नाहीं.

त्याच्या चरणापर्यंत जाण्याचा मार्ग फार बिकट, खडकाळ व कांटेरी आहे. तुमची तेथें पुरी कसोटीच लागते. अनन्यसाधारण श्रद्धा असावी लागते. नानाप्रकारचीं दुःखें व संकटें शीरोधार्य करावीं लागतात. मी वाटचाल त्या मार्गानें केली ती पायरी पायरीनें. भयंकर धीर धरावा लागतो तुम्हीं श्रद्धायुक्त अंतःकरणानें पायरी पायरीनें मार्गक्रमण करूं लागला म्हणजे तोच तुमचा वाटाड्या होतो, व ' चालविशी हातीं धरूनियां '—याचा अनुभव तुम्हांला मग पदोपदीं येऊं लागतो.

माझे वडील पूजाअर्चा नियमीतपणें करणारे व त्या कर्मकांडांत शक्य तेवढा वेळ खर्च करणारे होते. बालपणापासून मलाही देवाच्या पूजेचें वेड लागलें. माझ्या वडिलांस त्यांच्या त्या नेमधर्मांत सहाय्य करण्यास मी पुढें सरसावत असे. त्यांना फुलें जमा करून देणें, पुष्पमाळा तयार करणें, पूजा साहित्य जवळ आणून देणें हा माझा बालपणींचा आवडता छंद होता. त्या बालपणापासून मला देवभक्तीचें बाळकडू मिळालें. देवभक्ति मनावर बिंबली. मूर्तींत देवाचें वास्तव्य असतें ही माझी त्या वयापासून पक्की भावना.

देवभक्तीकडे अशारीतीनें अगदीं बालपणापासून माझें लक्ष लागलें. स्वर्गसोपानाची ती पहिली पायरी होती.

नंतर वयोमान वाढत चाललें तसतसा मला व्यायामाचा, शक्तीच्या प्रयोगाचा नाद लागला. कुस्त्या खेळूं लागलों. कोणी चालून आला असतां स्वतःचा बचाव कसा करावा, दांडपट्टा कसा खेळावा याचें शिक्षण मला देणारा एक हरिजन होता. मी त्याच्या घरीं शिकायला जात असे. मी ब्राह्मण व तो हरिजन हा भेदभाव मला माहीत नव्हता. नंतर हलक्या जातीच्या माणसाकडे ब्राह्मण जातींत जन्मलेल्या तरुणानें शिकायला जाणें हें चांगलें नाहीं हे विचार माझ्या डोक्यांत भरविण्यांत येऊं लागले.

याबाबतींत एके दिवशीं मी एकांतांत बसून विचार करूं लागलों. मला विचारांनीं अशी प्रेरणा झाली कीं, देवखोलींत बसून वडिलांबरोबर ज्या देवाची मी पूजाअर्चा करतों त्याच देवानें त्या हरिजनालाहि निर्माण केलें आहे नाहीं का ? मग तो हीन किंवा अस्पृश्य कसा बरें असूं शकेल ?

मग मीं तसाच उठलों. फुलें जमा केलीं. माळा गुंफल्या आणि त्या हरिजनाच्या

घरीं जाऊन माझ्या त्या हरिजन गुरुजीच्या गळ्यांत मी पुष्पमाळा घातल्या. त्याच्या पायांवर फुलें उधळलीं व त्याला साष्टांग प्रणिपात केला, तेथें मला देव दिसला.

ही जी मला प्रेरणा झाली किंवा हा जो मी मार्ग स्वीकारला त्यानेंच माझ्या नंतरच्या सेवाधर्माचा पाया घातला. कारण मी वैद्यकीय व्यवसाय पत्करून सर्वांचें शारीरिक दुःख दूर करण्यासाठीं बद्धपरिकर होऊं लागलों होतों. वैद्यकीय सेवा मनोभावें करायची तर वरिष्ठ, कनिष्ट, हलका फुलका असला भेदभाव करून चालेल का ? भेदभावानें दूषित झालेली ती मानवसेवा मानवेल का ?

माणसें नाना प्रकारच्या दुःखांनीं भाजून पोळून निघत आहेत. प्रत्येकाचें दुःख वेगवेगळें. कोणी शारीरिक तर कोणी मानसिक दुःखांनीं भाजून पोळून जात आहे. त्यांच्यापुढें मदतीचा प्रेमळ हात पुढें करून त्यांचा दुःखताप हलका करण्यासाठीं झटणें, यासारखें पुण्यकार्य, यासारखी श्रेष्ठ प्रतीची देवसेवा दुसरी कोणती असूं शकेल ?

माझ्या मनांत अशा प्रकारचे विचार सतत घोळूं लागले व ते माझ्याकडून कार्य करवून घेऊं लागले.

रोग, मग तो कोणत्याहि प्रकारचा असो, लहान असो, मोठा असो. त्यावर प्रयत्नें करून उपाय शोधून काढायचा व तो सर्व मानवजातीला प्राप्त होईल याबद्दल दक्षता बाळगायची.

मलायामध्यें रोगराईनें धुमाकूळ घातला आहे. तिकडे माणसें रोगांना बळी पडत आहेत. भयंकर यातना भोगीत आहेत. असे समजतांच मी तिकडे धांव मारली. मानव, मग तो भारतांतील वा मलायांतील असो. मानव प्राणी हा येथून तेथून एकच. प्रत्येकांत तोच आत्माराम, देश, प्रांत ह्या मानव निर्मित मर्यादा आहेत. त्या आपण तडाड तोडून त्यांच्या पलिकडे जाऊन पोहचलें पाहिजे.

मी मलायांत गेलों आणि तेथें आजारी, दुःखीकष्टी जनांच्या रुपानें देव मला भेटला. शारीरिक आणि मानसिक दुःखांनीं गांजलेले असंख्य लोक. तेच होते माझे देवाधिदेव. तेथें मी त्यांच्या सेवेला वाहून घेतलें.

माणसें किती किती प्रकारची असतात नाहीं का ? हें जीवन म्हणजे कित्येकांस मरणच वाटत असतें. त्यांना त्या जीवनांत मरणप्राय वेदना होत असतात. कित्येकांस मरण लौकर येईल तर बरे असें वाटत असतें. कांहीं लोक मरणाला कवटाळायला उत्कंठीत झालेले असतात तर कित्येक जिवाला कंटाळून आत्महत्त्या करीत असतात. असे नाना प्रकारचे लोक माझ्या पाहाण्यांत आले.


मग मला वाटूं लागलें कीं, देवानें हें जग केवळ दुःखें भोगण्यासाठींच निर्माण केलें आहे का ? मनाच्या समाधानाचा, दुःख विसरून जाण्याचा व दुःखावर विजय मिळविण्याचा कांहीं ना कांहीं मार्ग असलाच पाहिजे. तो जाणून घेऊन त्याचा उपयोग जनतेचें दुःख नाहींसे करण्यासाठीं आपण केला पाहिजे. दुःखितांच्या रूपानें देव माझ्या दारीं आला आणि त्यानें माझ्या मनाचा दरवाजा ठोठावला.

मग काय ? नंतर मलाया सोडून मी हिमालयाकडे वळलों.

देवाची एकनिष्ठपणें प्रार्थना व मानवसेवा हीं दोन्हीं एकाच वेळीं व एकनिष्ठेनें सुरू झालीं. आणि त्याचबरोबर मला नाना प्रकारचे अध्यात्मिक अनुभव येऊं लागले. माझें शरीर, माझें मन, माझें सुख या भावना मावळत गेल्या ! मनाचा परीघ वाढत चालला. ‘अवघें विश्वचि माझें घर’ असें वाटूं लागलें. सर्वत्र भगवंताच्या मूर्ति दिसूं लागल्या. काळोख नाहींसा झाला. मी दिव्य–प्रकाशांत वावरूं लागलों.

एक कसोटी लागायची होती. ती १९५० सालीं ( ता. ८ जानेवारी ) लागली. सर्व खल्विदं ब्रह्म ही भावना माणसाच्या मनांत दृढ झाली पाहिजे. ती वरकरणी कामाची नाहीं. रोमरोमांत भिनली पाहिजे.

आश्रमांत सत्संग चालू होता भजनानंदांत सर्वजण गुंग होऊन गेले होते. इतक्यांत एका पिसाळलेल्या मारेकऱ्याच्या रूपानें भगवन्त माझ्याकडे आला. त्यानें आरडाओरड करून दंगल माजविली. परंतु त्याचा प्रयत्न फसला. मी त्याला साष्टांग प्रणिपात केला. त्याला देवाप्रमाणें मानून त्याची पूजा केली. तो समाधान पाऊन निघून गेला. वाईट आणि चांगले, दुष्ट आणि सुष्ट, वाईटाशिवाय चागल्याची महती वाटत नाहीं.



# 'श्रीसाई अवताराचीं वैशिष्टयें'

( लेखांक ३ रा )

—केशव कृष्ण प्रधान

श्रीसाई बाबांना समाधि घेऊन जवळ जवळ ४८ वर्षे झालीं. म्हणजे ५० वर्षे पुरी होण्यास फक्त दोनच वर्षांचा अवकाश आहे. तरी दे... आजतागायत त्यांची कीर्ति नुसत्या हिंदुस्थानांतच नव्हे तर परदेशांतही पसरूं पहात आहे. उलटपक्षी असें म्हटलें तरी वावगें होणार नाहीं कीं श्रीसाई निधनानंतर जशी जशी वर्षें जात आहेत तशी तशी त्यांची कीर्ति अधिकाधिक वाढत आहे. त्यांच्या हयातीत तर त्यांची कीर्ति प्रथमतः शिरडीसारख्या एका लहान खेड्यापलिकडे सुद्धा कांहीं वर्षें पसरली नव्हती. शिरडीचे लोक त्यांना कित्येक वर्षें एक वेडा फकीर म्हणून समजत असत.

त्यांच्या हयातीत तर त्यांचे हाल कुत्रा देखील खात नव्हता असें दिसतें. ते शिरडी गांवच्या उकीरड्यावर रहात असत. तेथें शिरडीकरांनीं टाकून दिलेला ढोपर ढोपर कचरा जमा होत असे. त्या उकीरड्याला शेंकडों खड्डे पडले होते. तेथेंच पाली, विंचू, सरडे ह्याहि प्राण्यांची वस्ती होती. बसायला एक गोणपाट, ते पण फाटकेतुटके, नेसायला एक लुंगी व लंगोटी, ती पण निव्वळ चिंध्या झालेली. दुपारीं त्या खड्ड्यांत नाहींतर दूर जंगलांत काट्याकुट्यांत भर उन्हांत मन मानेल तेथें भ्रमण अशा तऱ्हेचा त्यांचा थाट असे. खिशांत कोणी मेहरबानीनें दिला तर एखादा पैसा नाहींतर ढब्बू, दुसऱ्या खिशांत जळक्या विडीची थोटकें, उदरनिर्वाहाकरितां रोज पांच घरीं भीक, त्यांतून वेडा–वेडा म्हणून गांवांतल्या पोरांनीं केलेली हेटाळणी, मारलेले दगड, अशी त्यांची दैनावस्था होती.

शिरडीचे तेली दिवे लावायचे म्हटले तर तेल देईनात म्हणून दीपोत्सवाची आवड असून अंधारांत वास्तव्य, मागून आणलेल्या भिकेतसुद्धां गोरगरीबांचा व इतस्ततः भटकणाऱ्या कुत्र्यांचा भाग. खोटे रागावणे, खोटे चिडणे, खोटे शिव्या देणे पण अंतर्यामी सर्व भूतमात्राविषयीं दया हा बाणा–अशा वेड्या फकीराला गावांत कोणी विचारत नसे. जो तो आपल्या कामात दंग. नाहीं म्हणायला श्री. बायजाबाई कोते या नांवाच्या बाईनें मात्र ह्या फकिराची पूर्ण परीक्षा केली होती. तिनें त्या

फकीराला रानावनांत दुपारी उन्हातान्हांत हिंडून शोधून काढावे व त्याला भाकर-तुकडा द्यावा, पाणी द्यावे. पुढें मात्र हळूहळू त्यांची परीक्षा लोकांना होऊं लागली.

श्री. नानासाहेब चांदोरकर आणि श्री. दासगणू यांच्यामुळें त्यांची कीर्ति महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं पसरली व त्यांच्या ८० वर्षांच्या लांबलचक आयुर्मर्यादेत १९०८ ते १९१८ या शेवटच्या दहा वर्षांत ती साधारणपणेंच पण हिंदुस्थानांतल्या दूरवरच्या ठिकाणीं पोहोंचली. तेथून मग लोक शिरडी येथें जमावानें जाऊं लागले. परंतु इतक्यांतच श्रीसाईबाबांनीं आपला इहलोकीचा अवतार संपविला.

श्रीसाई बाबांची कीर्ति हिंदुस्थानांतील घरोघर त्यांच्या मृत्युनंतरच पसरली हें आपल्याला दिसून येतें. श्रीसाईबाबांच्या हयातींत त्यांचीं छायाचित्रें कुणीही सहसा घेऊं शकले नाहींत. श्री द्वारकामाईमध्यें असलेले श्रीसाईबाबांचे मनोहर चित्र श्री. जयकर यांनीं स्वतःच्या स्मरणांतून हातानें काढलेलें आहे. नाहीं म्हणावयास श्रीसाईबाबांच्या हयातींत एका फोटोग्राफरला त्यांनीं आपला फोटो मोठ्या मुष्किलीनें काढून दिला असा एके ठिकाणीं निर्देश आढळतो. परंतु त्यावेळेस फोटो काढून झाल्यावर श्रीसाईबाबांनीं स्वतः त्या फोटोग्राफरला आपल्या स्वतःविषयीं जी भविष्य-वाणी सांगितली ती आज तंतोतंत खरी ठरली आहे. ते त्याला म्हणाले—

"अरे ! तूं आज माझा फोटो मोठ्या मुष्किलीनें काढूं शकलास. माझे फोटो पुढें गल्लोगल्लीं व घरोघरीं होणार आहेत."

आज बघावयास गेले तर श्रीसाईबाबांचे फोटो वाहनांत, दुकानांत, केश-कर्तनालयांत, घरांत, महालात, देवळांत सर्व ठिकाणी दृष्टीस पडतात. परंतु ही सर्व प्रसिद्धि त्यांच्या हयातीपेक्षां त्यांच्या समाधिनंतरच त्यांना मिळाली आहे. ही एकच गोष्ट श्रीसाई अवताराचे इतर अवतारापेक्षां असलेलें वैशिष्टय दाखविण्यास समर्थ आहे. लोक प्रत्यक्ष परमेश्वराच्या होऊन गेलेल्या नऊ अवतारांना विसरलेले दिसतात. परंतु श्रीसाई बाबांचे पुण्यस्मरण जसे जसे दिवस जात आहेत तसे तसे नव्यानें व जास्त भक्तिभावानें आणि अधिकाधिक विस्तारानें आपल्या नजरेस येत आहे. यावरून आपल्या हे लक्षात यावयास पाहिजे की माझी हाडे माझ्या तुर्बतीतूनसुद्धां बोलतील हे श्रीसाईबाबांचे उद्‌गार किती यथार्थ आहेत. ती तुर्बत दिवसें दिवस लोकांचे रक्षण जास्तच करू लागली आहे, जास्त प्रमाणांत त्यांच्या व्यवहारिक अडचणी व संकटे दूर करू लागली आहे. लोकांना जास्त जास्त आशिर्वाद देऊन सन्मार्गाकडे लावू लागली आहे.

स्वहयातींत चमत्कार करणें हे एक वेळ सोपे असेल. परंतु श्रीसाईबाबांनीं असे सिद्ध करून दाखविलेले दिसते कीं स्वहयातीनंतर चमत्कार करणें त्याहूनहि अधिक

शक्य आणि सोपे आहे. व ते करण्यास सत्पुरुषांना आदिभौतिक पंचमहाभूतांचा देह धारण केलाच पाहिजे असे नाहीं सत्पुरुष समाधि नंतर जणू कांहीं जास्तच जिवंत व चैतन्यमय होऊन पृथ्वीतलावरील मानवांना अधिक तत्परतेनें मदत करीत असतात. उलट पंचमहाभूतात्मक देह हा त्यांना ह्या कार्यांत एक अडथळाच वाटत असावा.

भगवान येशू ख्रिस्ताच्या मृत्युनंतर त्यांनीं स्वतः व शिष्याकरवी करविलेले चमत्कार येशू ख्रिस्ताच्या आयुष्यांत नमूद केलेले आहेत. ते त्यांच्या हयातींतलि चमत्कारांपेक्षांहि जास्त प्रकर्षमान् आहेत. श्रीसाई बाबांच्या हयातीनंतर त्यांच्या निव्वळ स्मरणानें किंवा उदी वापरानें झालेले चमत्कार श्रीसाईलीलेच्या मासिकांत दर महिन्याला आज कित्येक वर्षें प्रसिद्ध होत आहेत. ते हिन्दुस्थानांतील सर्व जमातींच्या लोकांकडून श्रीसाईलीलेच्या संपादकांना येत असतात. श्रीसाई अवतारांचें हें वैशिष्ट्य होऊन गेलेल्या इतर अवतारी पुरुषांच्याच नव्हे तर खुद्द परमेश्वराच्या मानलेल्या अवतारांच्या स्मरणानेंसुद्धां एवढ्या प्रकर्षाने झालेलें आपल्या ऐकीवांत नाहीं हें श्रीसाई अवताराचें महान् वैशिष्ट्य आहे ह्यांत शंका नाहीं.

आपल्या समाधीनंतर वर्षानुवर्षें मृत्युलोकावर आपल्या चमत्काराचें दिव्य अमृतसिंचन करणारा हा महापुरुष अलौकिक कोटींतील विभूतीपेक्षां निव्वळ देवच मानावा लागतो. परमेश्वराकडे जगाचें उदरभरण व निर्वाह चालविण्याची जबाबदारी जगतपिता या नात्याने साहजिकच येते.

पन्हाळा गडावर श्रीशिवाजी महाराजाचा गर्व हरण करण्यासाठीं श्रीसमर्थ रामदासाना दगड फोडून आंत जीवंत असलेला, निव्वळ परमेश्वराच्या कृपेने पोसलेला, बेडूक दाखवावा लागला. व "तू राजा असलास तरी तू प्रजेचें पालन—पोषण करतो आहेस; हा तुझा गर्व व्यर्थ आहे. तो सर्व राजांचा राजा माझा श्रीराम असून, तो सर्व जग पोसतो." हे सिद्ध करून दाखवावे लागले.

अगदीं त्याचप्रमाणें हरघडीला 'अल्ला मालिक आहे,' 'अल्ला भला करेगा,' अशी परमेश्वराची यादगिरी करण्याचा श्रीसाईबाबांनी हयातीनंतर ही शेकडो चमत्कार करून लोकांना हेच सिद्ध करून दिले की परमेश्वराचे प्रेषित पृथ्वीतलावरील आपला कार्यभाग आटोपल्यावर देह विसर्जन करून परमेश्वराशी अधिकच एकरूप होतात, आणि म्हणूनच त्यांच्या समाधिनंतर हयातीत केलेल्या चमत्कारांपेक्षाहि त्यांचे हयाती-नंतरचे चमत्कार अधिकाधिक लोकांना जास्त प्रकर्षानें आणि फलदायी स्वरूपात झालेले आढळतात.

'मरणं प्रकृतिः शरिराणाम्। विकृतिः जीवितं इति उच्यते।' या उक्तीप्रमाणें शरीरधारणा ही कसेहि झाले तरी एक विकृतीच आहे. मग ती सर्वसाधारण माण-

साची असो किंवा उच्च कोटीत गेलेल्या साधूची असो किंवा महान अवतारांची असो. साकार होऊन पृथ्वीतलावर आलेले ब्रह्म आपले पृथ्वीतलावरील कार्य आटपून मूळ निर्विकार, शांत, अव्यय अशा स्वरुपांत विलीन होऊन जास्त प्रभावानें विलसण्यास उत्सुक असते असे दिसते. श्रीज्ञानेश्वर, विवेकानंदांसारखें महापुरुष आपल्या अल्प वयांतच आपले महान कार्य समाप्त करून पृथ्वीतलावरून घाईघाईनें निघून गेले. रामकृष्ण परमहंस नेहमीं म्हणत असत कीं, “ नरेंद्र हा प्रती शंकराचा अवतार आहे. त्याला त्याच्या मूळ स्वरुपाची थोडी आठवण झाली कीं तो क्षणभरहि ह्या पृथ्वीतलावर रहाणार नाहीं.”

श्रीसाईबाबांचे खरेखुरे अवतारकार्य त्यांच्या आयुष्यातील शेवटच्या दहा वर्षांतच लोकांना बरोबर कळतें न कळतें तोंच श्रीसाई पडद्याआड झाले. परंतु त्यांची पृथ्वीतलावरील जनहिताय, जनकल्याणाय ही भावना इतकी तीव्र व प्रखर होती कीं, त्यांनीं समाधिनंतरही आज गेली ४८ वर्षें अव्याहत: तीच कामगिरी जास्त प्रकर्षानें पृथ्वीतलावर सुरूच ठेवली आहे. ह्याचे कारण जगत्नियंत्या परमेश्वराइतकीच त्यांना जगातील मानवांची काळजी आहे. याचाच अर्थ सर्वव्यापी सर्वांतर्यामी परमेश्वराशी त्यांची समाधिनंतर इतकी एकरूपता झालेली दिसते की, परमेश्वराच्या सर्व सार्वभौम सिद्धी, साहजिकच त्यांच्या निव्वळ स्मरणानें आपल्या मदतीस धांवून येतात.

‘ जीवनाचा वृक्ष फळभारे लवला । लागला क्षेत्रज्ञ कापणीला । ’ या उक्तीप्रमाणें सिद्धावस्थेच्या परिपक्व दशेला पूर्णपणें पोसल्यावरच परमेश्वरासाठीं सुखसमृद्धीची खैरात करण्याची मानवात पात्रता येते हे सिद्ध होतें. ‘ नर करणी करे सो नर का नारायण बन जाय । ’ हें वचन मानवाला तंतोतंत अमलांत आणण्यासारखे आहे याचा पूर्ण बोध आपल्याला श्रीसाई चरित्रावरून होतो.



# संतांची शांत वृत्ति

जाणोनि नेणतें करीं माझें मन । तुझी प्रेमखुण देऊनियां ॥
मग मी व्यवहारीं असेन वर्तत । जेवीं जळां आंत पद्मपत्र ॥
ऐकुनि नाइकें निंदास्तुति कानीं । जैसा कां उन्मनीं योगिराज ॥
तुका म्हणे ऐसें झालियावांचून । करणें तें तें सीण वाटतसे ॥

ह्या अभंगांत विलक्षण माधुर्य भरलेलें आहे. तो संगीतांत म्हटलेला ऐकून आपल्या वृत्ति अगदीं तल्लीन होऊन जातील. थोडें खोल पाण्यांत जाऊन ह्या अभंगांत आपणांस गारेगार करण्यासारखें काय आहे, तें आपण पाहिलें पाहिजे. ह्यांतील प्रत्येक शब्दाचा नीट विचार करून ह्या अभंगाचा अर्थ काय, ह्यांत तुकाराम आपणांस काय बोध करीत आहे तें आपण पाहिलें पाहिजे. कारण ह्यांतील प्रत्येक शब्द त्याच्या भारंभार सुवर्णाच्या मोलाचा आहे.

संतांच्या जीवनचरित्रांत काय रहस्य असतें, तें ह्या अभंगावरून आपणांस कळून येईल. संतांच्या हातून जगाचें हित कसें साधतें हें ह्यांत सांगितलें आहे. साधूंचें अंतिम ध्येय काय असतें व तें साध्य झाल्यावर त्यांच्या प्रत्येक वचनापासून व कृतीपासून मनुष्यमात्राला आनंद व सौख्य लाधून त्यांची श्रेयमार्गाकडे प्रवृत्ति कशी होते, हें ह्या अभंगापासून कळून येतें.

संतांचें मन हें कोमल असून त्याला सर्व कांहीं कळतें. जगास जीं सुखदुःखें भोगावीं लागतात, तीं सहृदय साधूंस विशेषतः जाणवतात. इतकें असून एखाद्या मुलाच्या मनाप्रमाणें त्याचें मन निर्मल, प्रफुल्ल व प्रसन्न असतें. पापाच्या संपर्कानें मनुष्य निमग्न होऊन जातो ह्याची जाणीव साधूंस चांगली असते; परंतु मनुष्यजातीवर त्यांचें निस्सीम प्रेम असतेंच. मनुष्याच्या हृदयाचें पूर्ण ज्ञान जर संतांस आहे तर हें हृदय पापानें कसें कलुषित झालेलें आहे, त्याला शुद्ध करून सन्मार्गाप्रत नेणें व आनंदित करणें हें काम किती प्रयासाचें आहे, हें जाणून हताश होऊन जगाचा उद्धार करण्याचें काम ते कसें सोडून देत नाहींत, दुःख व पाप ह्यांचा त्यांच्या मनावर परिणाम कसा होत नाहीं, ह्याचें आपणास आश्चर्य वाटतें.

पण आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कां कीं, ईश्वराचें मनुष्यजातीवर किती प्रेम आहे तें साधूंस माहित असतें. मनुष्याविषयीं देवाचें प्रेम किती थोर व अगाध असतें ह्याची कल्पना आपणांपेक्षां साधूंस विशेष असते. नेहमी दृष्टीस पडणारे सृष्टींतील

चमत्कार ह्यांपासूनहि त्यांना ईश्वराच्या प्रेमाचा बोध होतो. सूर्य सज्जन व दुर्जन ह्यावर सारखाच प्रकाश प्रकाशतो; पर्जन्य सर्वांवर सारखी वृष्टि करतो, सूर्याचा प्रकाश व पर्जन्याची वृष्टि ह्यांपासून साधूंस ईश्वराच्या दयेचा बोध होतो; त्यांना वाटतें कीं, ज्याप्रमाणें भाजून निघालेली जमीन पावसाचें पाणी चांगल्या रीतीनें शोषून घेते, त्याप्रमाणें व्यथित व विद्ध झालेलें, पंकांत मग्न झालेलें, आर्त असें हृदयच ईश्वराच्या दयेस विशेष पात्र असतें. ईश्वराच्या ठायीं ह्या असलेल्या प्रेमाची जाणीव संतांस असल्यामुळें, मनुष्यजातीविषयीं त्यांना सहानुभूति वाटते आणि त्यांना एक प्रकारचें दिव्य ज्ञान होते. गेटी म्हणतो, सूर्याचें तेज पाहून तुम्हाला विस्मय वाटतो, परंतु मनुष्याच्या हृदयांत सूर्य आहे तो ह्यापेक्षांहि सुंदर आहे ! भक्तास हा अंतःकरणांत वास करणारा सूर्य दिसतो, वरवर असणारें दुःख आणि पाप तेवढें आपल्या दृष्टीस पडतें; परंतु आंत वसणारे निर्मल व शुद्ध, पुण्याचें आणि सौंदर्याचें बीज साधूच्या दृष्टीस पडतें. दुःख व पाप पाहून ते मागें सरत नाहींत, कारण त्यांची दृष्टी त्यांच्या पलीकडे पोंचत असते; दुःख आणि पाप ह्यांचा भर अगदी वर आहे तो काढून टाकला, धूऊन काढला, तर शुद्ध व निर्मळ अंतःकरणाचें तेज फांकूं लागेल हें त्यांना माहित असतें.

संतांचें मन कसें असतें व ईश्वराच्या पवित्रपणापासून त्याला शक्ति कशी प्राप्त होते, हें वर ठोकळ मानानें सांगितलें. तुकारामानें त्यांना कमलपत्राची किंवा कमळाची उपमा दिली आहे, ती ह्यासाठींच. कमळ तळ्यांत उत्पन्न होतें, परंतु त्याची दृष्टी आकाशांत प्रकाशित होणाऱ्या सूर्याकडे लागलेली असते. ही कमलपत्राची किंवा कमळाची उपमा किती सुंदर आहे ! कमळ हें हिंदुस्थानांतील कवीचें आवडतें पुष्प आहे. पवित्रपणा व प्रेम ह्यांचें तें निदर्शक आहे. तें तळ्यांत—चिखलांत रुजतें; परंतु त्या चिखलाची त्याला बाधा होऊं शकत नाहीं. इतकेंच नाहीं, तर तें नेहमी सूर्याकडे दृष्टी लावून त्याच्यापासून सौंदर्याचा लाभ पोषण करून घेतें व तळ्यावर आपली प्रभा पसरतें. तळ्याचें पाणी घाणेरडें किंवा क्षुब्ध असतें, तथापि कमळ सर्वदां किती शांत, सुंदर व निर्मल असतें !

संतांच्या चारित्रांत हीच शांति दिसून येते; आपली कोणी स्तुति केली कीं, आपणांस आनंद होतो, आणि निंदा केली कीं, वाईट वाटतें; परंतु संतांची गोष्ट तशी नाहीं, त्यांची तुम्ही निंदा करा कीं स्तुति करा, त्यांच्या मनावर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं. योगी तपःसाधन करीत असतां ध्यानमग्न झाल्यावर जसें त्याचें मन होतें, तसें संतांचें मन विकाररहित असतें. सूर्य प्रखर तापानें साधूला दग्ध करूं लागला, पाऊस भिजवूं लागला, किंवा थंडी फार पडूं लागली, तरी त्याचेवर ह्या सर्वांचा कांहींच परिणाम होत नाहीं. तो पूर्वीप्रमाणेंच अगदीं निश्चल असतो. संतांचा छळ केला किंवा निंदा केली तर त्यांना दुःख वाटतें, परंतु आत्मसंयमन करून तें दुःख बाहेर दाखवीत

नाहींत, एवढेंच तुकारामाचें म्हणणें नाहीं, तर निंदा किंवा छळ ह्यांच्या योगानं त्यांची शांति मुळींच ढळत नाहीं! व त्यांना त्रास देऊं पाहणाऱ्या मनुष्याबद्दल अंतःकरणापासून दयाच वाटते. त्यांच्या मनाची अशी स्थिति असते म्हणूनच त्यांच्या हातून एवढीं चांगलीं कृत्यें घडून येतात. आपल्या मनाची अशीच स्थिति करण्यास आपण सर्वकाळ झटलें पाहिजे.

तीस चाळीस वर्षांपूर्वीच्या बालपणाकडे आपण नजर फेंकली तर जे आज पन्नास वर्षांचे आहेत अशा पुष्कळांस आठवेल कीं, आपण पहांटेस जागे झाल्याबरोबर आपल्या कानांवर प्रथमच जो शब्द पडत असे, तो आपल्या घरांतील वृद्ध आईचा स्तोत्रपाठ होय; या वृद्ध बाया सर्वांच्या आधीं उठत, आणि घरांतील सडासंमार्जन किंवा दुसरें कांहीं गृहकृत्य करीत असतांना तोंडानें त्या तुकारामाचे किंवा नामदेवाचे अभंग म्हणत. या अभंगामुळें त्यांच्या मनाला स्वास्थ्य प्राप्त होई, स्वतःचीं कर्तव्यें करण्यास हुषारी वाटे व आयुष्यांतील कष्ट सोसण्यास सामर्थ्य येई. ज्यांच्या ज्यांच्या कानांवर हें गाणें पडे, त्यासही पहांटेच्या वेळीं मोठी हुशारी वाटे व पुढील कार्यक्रम उत्तम रीतीनें पार पाडण्यास ते उत्साहित अंतःकरणानें सिद्ध होत.

यासाठीं आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आज अनेक बाबतींत आपणांस कितीहि निकृष्टावस्था प्राप्त झालेली असली तरी हे अभंग म्हणजे आपली वडिलोपार्जित जिनगी आहे; आपल्या थोर साधूंच्या अध्यात्मिक अनुभवाचा या अभंगांत संग्रह केलेला आहे. यामुळेंच आमच्यांमध्यें थोडें आध्यात्म जीवन टिकून आहे, व आमच्या संसारांत अद्यापदेखील जें माधुर्य आहे, तें या साधूंच्याच जीवनाचा आमच्या संसारावर आनुवंशिक रीतीनें झालेल्या परिणामाचें फळ होय. म्हणून आमच्या साधुसंतांच्या ज्या उक्ति त्यांत चांगलें व सुंदर म्हणून जें कांहीं आहे, तें आपल्यामध्यें सतत जागृत व जिवंत राहील व त्यांतील जें माधुर्य व स्वारस्य तें आपल्यामध्यें आणण्याचा प्रयत्न करूं या.

आपल्या ठिकाणीं पौरुषाचा संचय होणें म्हणजे आपली वाढ होणें होय. दिवसानुदिवस आमची वाढ होत आहे. आपल्या सर्व आयुष्यभर सतत एकसारखी वाढ चालू आहे, व ती वाढ म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वाची वाढ होय. कारण, आपल्या शरीराची वाढ कांहीं मर्यादित कालपर्यंतच होते. परंतु ह्या वाढीचें तसें नाहीं. आपल्या आयुष्याचा सर्व रोख स्वत्व प्राप्त करून घेण्याकडे आहे. परंतु आतां प्रश्न हा कीं, कोणत्या प्रकारच्या पुरुषार्थाची आपण वाढ करावयास पाहिजे ? व आपण कोणती वाढ जोडीत आहों ? आपल्या ही गोष्ट ध्यानीं येत असो अगर नसो, आयुष्यांतील प्रत्येक क्षणीं आपण आपलें शील बनवीत असतों. एकदा विचार

आपल्या मनांत येतो, तो वाईट असेल किंवा चांगला असेल; तो तेथेंच आपण राहूं दिला तर शरीरामध्यें देखील त्याचा ताबा आपल्या मनावर चालतो व पुढें तो विचार आपल्या आयुष्याचा एक भागच बनतो. याप्रमाणें आमच्या मनाची वाढ होत आहे. पण आपण पाहिलें पाहिजे, तें हें कीं, आपण केवळ परिस्थितीच्या ओघाबरोबर वाहात जात नसून आपले कांहींतरी शील बनत आहे किंवा कसें ? केवळ परिस्थितीच्या ओघाबरोबर जर आपण वाहत जात असलों, आपल्या स्वत्वाची जर कांहीं वाढ होत नसली तर ह्या ओघवाह्यतेनें आपलें समाधान होणार नाहीं. ही ओघवाह्यता खरें पौरुष प्राप्त करून घेण्याचें आपल्या अंगीं असलेलें जें सामर्थ्य त्यास शोभत नाहीं. मनुष्याच्या ठिकाणीं स्वतःविषयीं जागृति आहे; आपण कोण आहों, आपणास अधिकार काय आहे हें जाणण्याचें सामर्थ्य आहे, त्याच्यांत आपली योग्यता वाढविण्याची शक्ति आहे. आणि हाच मनुष्य व पशु यांतील भेद आहे. म्हणून आपल्या ठिकाणची पशुवृत्ति आपण जिंकिली पाहिजे. ही पशुवृत्ति नष्ट करून मग आपल्याला वरच्या पायरीवर चढावयाचें असतें हें आपल्या दृष्टीपुढें असलें पाहिजे. याज्ञवल्क्य स्मृतीवर टीका करणाऱ्या विज्ञानेश्वरानें विद्या या शब्दाची व्याख्या करितांना, या आयुष्यामध्यें प्राप्तव्य काय आहे याचें उत्तम वर्णन केलें आहे. तो म्हणतो, विद्या म्हणजे पुरुषार्थसाधन. या आयुष्यांतील मनुष्याचें उच्चतम ध्येय तें प्राप्त करून घेण्याचें साधन म्हणजे विद्या होय. नुसती माहिती मिळविणें हा विद्येचा मुख्य हेतु नव्हे, असा विज्ञानेश्वर यांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. आपलें सामर्थ्य वाढविणें म्हणजेही विद्या नव्हे; तर जे ध्येय आपल्या सर्व आयुष्यभर आपल्या ठिकाणीं ईश्वरी प्रेरणा जागृत ठेवावयास साधनीभूत होईल, अशा ध्येयाविषयीं उत्कट प्रेम उत्पन्न होणें हें खऱ्या विद्येचें कार्य होय.

आतां हें खरें आहे कीं, आपणांस हल्लींच्या काळीं ज्ञान संपादिलें पाहिजे, तें वाढविलें पाहिजे; आपण आपली आकलन शक्ती, ग्राहक शक्ती, वाढविली पाहिजे व आपली कर्तृत्वशक्तीही वाढीस लाविली पाहिजे. पण विज्ञानेश्वराच्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, प्रथम अत्यंत श्रेष्ठ असें ध्येय आपण आपणापुढें ठेविलें पाहिजे; नंतर तें साध्य करून घेण्यासाठीं आपण सारखें झटलें पाहिजे. त्यासाठीं आपलें सर्व सामर्थ्य व आपलें जीवनही आपण वेंचिलें पाहिजे. असें जर झालें तर आपल्या ठिकाणीं स्पष्ट व गूढरूपें वसत असलेल्या सर्व शक्ती वाढतील व आपलें सामर्थ्य वाढेल.



# थोरामोठ्यांचा भक्तिभाव
# मातृभक्तीचा महिमा

आईबापांची आज्ञा मानणें आणि त्यांस संतोष होईल अशा रीतीनें वागणें हें मुलांचें अवश्य आणि पवित्र कर्तव्यकर्म आहे, असें पृथ्वीवरच्या सर्व धर्मशास्त्रांत सांगितलें आहे, आणि त्याप्रमाणें वागण्याची पद्धति फार प्राचीन काळापासून पडली आहे.

देसिमस म्हणून एक बादशहा होता. त्याला एकदां असें वाटलें कीं, आतां आपला वृद्धापकाळ झाला आहे, यास्तव आपले गादीवर आपला मुलगा दिसियस ह्यास बसवावें, आणि आपण काळजींतून मोकळें व्हावें. त्याप्रमाणें त्यानें त्याच्या राज्याभिषेकाची तयारी करविली. तेव्हां दिसियस त्यास फार मर्यादशीलतेनें म्हणाला, " मी बादशहा झाल्यावरच, मी तुमचा मुलगा आहे, हें कदाचित विसरेन आणि माझे हातून तुमचा उपमर्द होईल, म्हणून तें मला मुळींच नको. बादशहा म्हणवून घेण्यापेक्षां पितृभक्त पुत्र म्हणवून घेणें हें मला विशेष भूषणास्पद वाटतें. तुम्ही मला आज्ञा करा. ती मला शिरसावंद्य आहे. "

लॉर्ड लांगदेल ह्यानें आपल्या आईविषयीं एकदां म्हटलें, " तराजूच्या एका पारड्यांत माझ्या आईला घातलें आणि दुसऱ्यांत बाकी सगळें जग घातलें, तर माझ्या आईचें पारडें खालीं राहून जगाचें पारडें वर जाईल. " ह्यावरून त्याची मातृनिष्ठा दिसून येते.

थीब्स येथील नामांकित योद्धा इपामिनंदास ह्यास कोणीं एकानें एकदां असें विचारलें कीं, " तुमच्या सगळ्या जन्मांत अत्यंत संतोषप्रद अशी गोष्ट तुम्हांला कोणती वाटते ? " त्यास त्यानें उत्तर दिलें, " मी मोठी लढाई मारिली तिची शुभवार्ता ऐकण्यास माझीं आईबापें जिवंत होतीं ही गोष्ट मला सर्वांत संतोषकारक झाली. तिची बरोबरी दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीच्यानें करवणार नाहीं."

पोलंड देशाचा राजा पोलेसलास हा आपल्या बापाची प्रतिमा नेहमीं आपल्या गळ्यांत बाळगीत असे, आणि तें मोठें भूषण मानीत असे. आणखी कोणत्याही एकाद्या मोठ्या कामास हात घालण्याच्या आधीं तिच्या पायां पडून म्हणे कीं, " पित्या, तुझ्या कीर्तीस शोभणार नाहीं असें काम माझे हातून होऊं देऊं नको." शिकंदर बादशहा इकडे आशियाखंडांत आला असतां, त्याच्या राज्याचें सगळें काम पहाणारा अंतीपातर

हा मार्मिदोन देशांत होता. त्याच्याकडून पत्र आलें कीं, राज्यकारभाराच्या कामांत आईसाहेब महाराज ( आलिंपियास, शिकंदरची आई ) वारंवार हात घालितात, त्यामुळें फार घोंटाळा होतो; ह्यास्तव त्यांस तसें न करण्याविषयीं आपण सुचवावें. तें वाचून त्याला शिकंदरानें उत्तर दिलें, “ हें माझ्यानें करवणार नाहीं. अशीं सहस्र पत्रें तूं लिहिलस तरी तीं माझ्या आईच्या आसवाच्या एका थेंबानें भिजून नाहींतशीं होतील, हें तुला ठाऊक नाहीं काय ? ”

इंग्लंडचा राजा पहिला एडवर्ड हा पॅलेस्तैन प्रांतांत धर्मयुद्धामध्यें गुंतला असता, त्याचा एकुलता एक मुलगा, आणि बाप तिसरा हेनरी हे दोघे मरण पावल्याचीं वर्तमानें त्याला एकामागून एक थोड्याच अंतरानें कळलीं. पुत्राचें मरण ऐकून त्याला दुःख झालें, परंतु तें सगळें मोठ्या गांभीर्यानें त्यानें गट्ट केलें; परंतु पितृमरणाचें वर्तमान कानीं पडतांच त्याच्या काळजानें ठाव सोडिला, आणि तो पोरासारखा रडूं लागला. त्यास बराच वेळ लोटल्यावर त्याच्या मर्जीतल्या एका गृहस्थानें त्यास असें अंतर पडण्याचें कारण मोठ्या युक्तीनें विचारिलें. तेव्हां तो राजा म्हणाला, “ परमेश्वर कृपा करील, तर मला दुसरा मुलगा होईल. परंतु पित्याच्या मरणानें माझी हानी झाली आहे. ती आतां कधिहि भरून यावयाची नाहीं.”

सर थामस मूर ह्या नांवाचा एक मोठा पुरुष इंग्लंडांत होऊन गेला. तो लॉर्ड चान्सलर झाला होता, आणि त्याचा बाप न्यायसभेमध्यें मुख्य न्यायाधीश होता. सर थामस मूर ह्याचा नित्यक्रम असा असे कीं, बाप न्यायासनावर बसलेला असे, तेथें जाऊन त्याच्या पायां पडावें, त्याचा आशीर्वाद घ्यावा, आणि मग आपल्या अत्यंत महत्त्वाच्या कामास लागावें. त्याच्या एकंदर वर्तनावरून असें दिसतें कीं, तो आशीर्वाद मिळाल्यावाचून आपल्या हातून काम चांगलें व्हावयाचें नाहीं, असा त्याच्या मनाचा पूर्ण ग्रह झाला होता.

ग्लॅड्स्टन ह्यांस गणित आवडत नव्हतें. परंतु केवळ वडिलांच्या सांगण्यावरून ते गणितांत प्रवीण झाले. रोमचा इतिहास लिहिणारे प्रख्यात ग्रंथकार गिबन् ह्यांचें लग्न एका मुलीशी व्हावयाचें अगदीं ठरलें होतें, परंतु तें त्यांच्या तीर्थरूपांस पसंत पडलें नाहीं, तेवढ्यावरून तें त्यांनी केलें नाहीं.

आपल्या इकडेही अशीं अनेक उदाहरणें झालेलीं असतील. परंतु त्यांचें वर्णन फारसें आढळत नाहीं, याचें फार वाईट वाटतें. रामायणामध्यें दाशरथीरामाचें उदाहरण किती उत्तम आहे ! पित्याचें वचन खरें करण्याकरितां, सर्व सुखाची वासना एकीकडे ठेवून, राज्याचा त्याग करून, चवदा वर्षें वनवास करण्याचें त्यानें पत्करिलें, ही गोष्ट साधारण नव्हे. हिच्या जोडीच्या गोष्टी इतिहासांत फारच थोड्या सांपडतील.

अर्वाचीन इतिहासामध्यें एका अल्पवयस्क मुलीचें उदाहरण आहे, तेंही अप्रतीम आहे. तें उदाहरण म्हणजे, भीमसिंगाची कन्या कृष्णाकुमारी हिचें होय. केवढें तिचें धैर्य आणि केवढी तिची पितृनिष्ठा! पित्याच्या राज्याच्या रक्षणार्थ प्राण देण्यास ती तयार झाली! तिनें आपल्या दुःखित मातुश्रीस जें उत्तर दिलें, तें एका सोप्या कवितेंत गुंफिलें आहे, तें असें—

### श्लोक

ज्यानें जन्म दिलें कडे मिरविलें घेवोनि खांदा भलें
केलें लालपालनादि सगळें जें मत्सुखा लागलें
त्याचे संकटवारणीं खरचिला हा देह माझा जरी
माझे पुण्यतरू सुखप्रद फलीं ओथंबले हो तरी — १

प्राण्यांतें मरणें जगीं सकलही केव्हां न केव्हां तरी
गेले कोट्यवधी तयांत कसली या पामरीची परी
ताताच्या यशरक्षणीं मरण हें लमाहिपेक्षां मला
संतोषप्रद वाटलें शपथ गे शंका नसावी तुला. — २

महाराष्ट्रांत बृहस्पती म्हणून जे प्रसिद्ध होते, ते थोरले चिपळूणकर अत्यंत मातृभक्त होते. अलीकडच्या विद्वानांत गणलेले काशिनाथ त्रिंबक तेलंग हे मोठ्या पदास चढल्यावरहि आपल्या आईबापाच्या अर्ध्या वचनांत वागत असत. पदवीधर मुकुटमणी म्हणून जे आमच्या ह्या देशांत गाजून गेले, ते महर्षी महादेव गोविंद रानडे ह्यांनींही आपल्या मनाची सगळी ओढ एकीकडे ठेवून, शेंकडों मोठमोठ्या नामांकित मित्रांचा रुसवा सोसून आणि सगळ्या समंजस माणसांच्या ठपक्यास आपणास पात्र करून घेऊन द्वितीय संबंधाचे वेळीं, पित्याची आज्ञा मान्य केली.

ह्यांत कांहीं विशेष नाहीं. आपल्या महाराष्ट्रांतले संतशिरोमणि तुकाराममहाराज, यांनीं आईबापांविषयीं म्हटलें आहे :—


तुका म्हणे मायबापें। अवघीं देवाचीं स्वरूपें॥

ह्यापेक्षां आईबापांची पदवी किती वर्णावी!

असो. अशा आणखी पुष्कळ गोष्टी सांगतां येतील. आईबापांची आज्ञा पाळिल्यानें हित झाल्याचीं उदाहरणें सहस्रावधि आहेत; अहित झाल्याचें उदाहरण एकदेखील सांपडावयाचें नाहीं. आईबापांच्या हातून मुलाचें अहित होणें हें अशक्य आहे. चीन देशामध्यें मुलगा विद्येनें किंवा संपत्तीनें कितीहि जरी थोर झाला असला,

तरी त्यानें आपल्या बापाच्या आज्ञेंत वागलेंच पाहिजे, असा कायदा आहे; आणि बापानें मुलावर जर कांहीं फिर्याद केली, तर त्याबद्दलचा पुरावादेखील मागत नाहींत, म्हणजे आईबाप मुलाचें कधींहि वाईट करावयाचींच नाहींत, असा तेथें पूर्ण समज आहे.

आणखी, उपकार म्हटले म्हणजे ते कोणींहि केलेले असोत, ते फेडणें हें ऋण फेडण्याइतकेंच आवश्यक आहे. आणि विचार केला म्हणजे असें दिसतें कीं, मुलांवर आईबापांचे उपकार अपरिमित झालेले असतात. ते फेडणें हा एक हेतु, त्यांच्या सांगण्यापासून आपलें खरोखर हितच व्हावयाचें असें खचीत समजून तें साधून घेणें हा दुसरा हेतु, आणि त्यांस संतोषविल्याच्या योगानें परमेश्वराची कृपा संपादणें हा तिसरा हेतु. हे तीन हेतु निरंतर मनांत ठेवून आमच्या तरुण वाचणाऱ्यांनीं मोठ्या आनंदानें आपल्या मातापितरांच्या आज्ञेंत वागावें, आणि आपलें इष्टपरहित साधून घ्यावें, एवढी प्रार्थना करून आम्हीं हा अल्पविषय समाप्त करितों.



ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २.

टे. नं. २२८५४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण.

होलसेल व रीटेलर्स

# बोधलेबुवांचें बोधप्रद जीवन

## ( पूर्वार्ध )

बालेघाट प्रांतांत धामणगांव येथें माणकोजी जगताप नांवाचा एक पाटील होता. यासच बोधला असें म्हणत. तो पांडुरंगाचा परम भक्त होता. त्याच्या बायकोचें नांव ममताई असें असून तीहि भाविक, आज्ञाधारक व पतिव्रता होती. त्याच्या ज्येष्ठ पुत्राचें नांव यमाजी असें होतें. हा यमाजी वृत्तीनें फार उदास असे. यमाजीची पत्नी भागीरथी ही तर सद्गुणाची खाणच होती.

त्याच्या घरची स्थिति संपन्न होती. धनधान्य, गुरेंढोरें, मानमान्यता या बाबतींत बोधल्याला कांहीं कमी नव्हतें. पुत्रस्नुषेसह बोधला व ममताई प्रपंच करीत होते तरी ते चौघेजणहि फार विरक्त होते. हृदयामध्यें पंढरीनाथाचें ध्यान करून ते नेहमीं भजन करीत असत.

दर पंधरवड्याच्या एकादशीला बोधराज पंढरपुरची वारी करी. द्वादशीच्या पर्वकाळीं क्षुधित याचकांना अन्नदान करून त्रयोदशीला घरीं परत यावयाचें, असा बोधल्याचा नित्य क्रम असे.

एकेसमयीं देशामध्यें भयंकर दुष्काळ पडला. पैका खर्चूनहि धान्य मिळणें अशक्य झालें. लोकांची दुर्दशा पाहून बोधल्याचें चित्त कळवळलें. त्यानें आपल्या बायकोस सांगितलें कीं, "सुकत्या झाडाला पाणी घालणें, थंडीच्या दिवसांत वस्त्रदान करणें, रोगिष्ट प्रवाशास औषध देणें, बुडत्या माणसाला जलांतून वर काढणें, दुर्बल ब्राह्मणाचें लग्न करून देणें, जळत्या घरावर पाणी ओतणें, अनाथ प्रेतास अग्निसंस्कार करणें, तृषाक्रांतास पाणी पाजणें, निर्बळ गुरांना गोंजरणें, फासांतून पशुपक्षी सोडविणें या सर्व गोष्टीप्रमाणेंच क्षुधिताला अन्नदान करणें ही गोष्ट अक्षय्य पुण्याची जोड करून देणारी आहे. असें पुण्य पदरीं असेल तर सात्विक वैराग्य उत्पन्न होऊन रामचरणाचें दर्शन होईल. उग्र जपतप केलें तरी तें सर्व फलभोगामुळें लयाला जातें. परोपकार साधणाराच्या अंगांत मात्र विरक्तपणा अक्षय्य संचरून राहतो. तेव्हां या दुष्काळांत भुकेलेल्या दीनाला तूं यथाशक्ति अन्नोदक देत जा."

याप्रमाणें आपल्या नवऱ्याचा उपदेश ऐकून ममताबाई तसेंच वर्तन करूं लागली. बोधल्याच्या घरीं अन्न प्राप्त होतें असा सर्वत्र लौकिक पसरला. साखरेच्या ढिगावर गोळा होणाऱ्या मुंग्यामाश्याप्रमाणें बोधल्याच्या वाड्यांत पांथस्थांची गर्दी होऊं लागली. शीतल वृक्षछायेचा आश्रय करण्यास जसे प्रवासी धांवून जातात किंवा डोंगरावरील पाण्याशीं डबक्याशीं जशीं श्वापदें गर्दीनें जमतात त्याप्रमाणें बोधल्याच्या घरीं तृषार्तांची दाटी जमूं लागली.

असे बरेच दिवस लोटल्यानंतर बोघल्याजवळचें धनधान्य संपलें. मग त्यानें घरातील डागदागिनें मोडून अन्नदान चालविलें. तेंहि संपलें तेव्हां त्यांचा नाईलाज झाला. त्याच्या घरचीच गाईगुरें उपाशी मरूं लागलीं तेव्हां त्यानें तीं लोकांना देऊन टाकली आणि उपाधि विरहित होऊन तो हरिहरि करीत बसला.

तो स्वतः मोलमजुरी करून कुटुंबरक्षण करूं लागला. त्यांतल्यात्यांतच अतिथीचा सत्कार करण्यास दक्ष असे; अतिशय आपदा प्राप्त झाली तरी अस्वस्थ होऊन तो हरिभजन विसरला नाहीं. मोठा भाव धरून तो परमेश्वराचे गुणानुवाद वर्णन करीत असे. त्याची सत्य भक्ति पाहून देवाधिदेवानें त्याला दर्शन दिलें.

अंगीं ज्ञान असून जर अनन्य भक्तिभाव नसेल तर ईश्वरदर्शन होणार नाहीं. कोल्हाट्याचें पोर थोर झालें म्हणजे जसें त्याचें अंग लवत नाहीं, भाजलेलें बीं जसें उगवत नाहीं, थोर वृक्ष जसा लवत नाहीं, वृद्धाच्या तोंडांत जसे वेदाक्षर बसत नाहीं त्याप्रमाणें ज्ञानाभिमानानें ताठलेल्या जनांना ईश्वदर्शन होत नाहीं. हा विचार जाणून साधुसंत ज्ञानाभिमानाच्या ताठ्यापासून दूर असतात. हें तत्व जाणूनच बोघल्यानें भक्तिभावास मिठी मारिली असल्यानें पांडुरंगांनीं बोघल्याला दर्शन देऊन कृतार्थ केलें.

एका वारीच्या प्रसंगीं बोघल्याजवळ वाटखर्चीसहि द्रव्य नव्हतें. तें पाहून ममताई दुःखित झाली. चंद्रभागेमध्यें स्नान केल्यावर ब्राह्मणास दक्षिणा कोठली द्यावी व द्वादशीला अन्नदान कसें करावें या चिंतेनें बोघला व्यापून गेला. शेवटीं त्यानें असें ठरविलें कीं, रानांतील लांकडें तोडून गांवामध्यें मोळया विकावयाच्या आणि त्या विक्रीच्या द्रव्यावर दक्षणा व अन्नसंतर्पण भागवावयाचें अशा बेतानें तो बरोबर एक कुऱ्हाड घेऊन पंढरीस निघाला.

आभाळ निघून गेल्यावर आकाश जसें निर्मळ दिसतें, किंवा महापूर ओसरल्यावर नदी जशी निश्चल दिसते, त्याप्रमाणें घरातील वैभव नष्ट झाल्यानंतर बोघला चित्तामध्यें निश्चल व प्रेमभरीत झाला. डोक्याला चिंध्या गुंडाळून अनवाणीच पंढरीस चालला. त्यानें वाटेंत लांकडे तोडून त्यांची मोळी डोक्यावर घेतली. हरिभजन करीत करीत पंढरीस येतांच प्रथमतः त्यानें आपली मोळी बाजारांत नेऊन ती तीन पैशाला विकली. स्नान केल्यानंतर संकल्प सांगणाऱ्या ब्राह्मणाला त्यानें एक पैसा धर्म केला. एक पैशाच्या खारका, बुका माळा वगैरे घेतल्या. नंतर देवळांत जाऊन त्यानें देवाची पूजा केली. रात्रीं कीर्तनास बसून चारी प्रहर जागरण केलें. दुसऱ्या दिवशीं द्वादशी असल्यानें स्नान करून तो चिंतामग्न होऊन बसला. विप्राला दान करण्याकरितां आपल्याजवळ शिधा नाही या कल्पनेनें उद्विग्न होऊन त्यानें जवळच्या तिसऱ्या पैशाचे पीठ विकत घेतले. फडक्याच्या पदरांत तें पीठ बांधून तो चंद्रभागेच्या कांठीं जाऊन बसला. आपलें पीठ खाण्याकरितां येईल असा जर कोणी ब्राह्मण भेटेल तर आपण आपल्यास धन्य मानूं असें त्यास वाटूं लागलें.

पण राजवाडा सोडून खोपटाच्या आश्रयास कोण येणार? दूध टाकून ताकाचें भुरके कोण मारणार? यात्रेला आलेल्या थोर व श्रीमान् गृहस्थांच्या समाराधना टाकून आपल्या सारख्या दुर्बळाकडे कोणीही येणार नाहीं अशी पूर्ण खात्री वाटून तो चिंताकुल होऊन विठ्ठलाचें भजन करीत बसला.

बोधल्याचा निर्मळ भाव पाहून पांडुरंगांनीं एका वृद्ध ब्राह्मणाचें सोंग घेतलें. हातामध्यें काठी घेऊन डोक्याला टोपी घालून जीर्ण वस्त्र नेसून थरथरा कांपत कांपत तो वेषधारी ब्राह्मण वाळवंटामध्यें बोधल्याजवळ येऊन बोधल्यास म्हणाला "तूं आमचा पुरातन यजमान आहेस. या क्षेत्रांत माझ्यासारखे पुष्कळ ब्राह्मण आहेत. पण त्यांचे यजमान श्रीमान् आहेत. मला दुर्बळाला कोणीच विचारीत नाहीं म्हणून मी अन्नप्राप्तिकरितां तुजकडे आलों आहे. माझा तुला आशीर्वाद आहे."

विप्राचें भाषण ऐकून बोधला संतोषला. त्यानें लागलीच गाठोडी सोडून पीठ बाहेर काढिलें आणि तें ब्राह्मणाच्या पदरांत टाकिलें. नंतर संकोचवृत्ति होऊन तो त्या वृद्धास म्हणाला "हें पीठ कोरडेंच आहे. त्याच्याबरोबर डाळमीठ वगैरे कांहींच नाहीं."

बोधल्याच्या मनांत ब्राह्मण जेवावा अशी आवड आहे हें पाहून तो वृद्ध म्हणाला, "समयाला जें अनुकूल होतें तें तुम्हीं मला दिलें. डाळ, मीठ यांच्यावांचून कांहीं अडलें नाहीं. आमचें बिऱ्हाड देवळांत आहे. तेथें दाटी असल्यामुळें स्वयंपाक करण्यास जागा नाहीं. तूं जर गोऱ्या वेंचून आणशील तर मी येथेंच पानगे भाजतो आणि ते आपण भक्षण करूं."

बोधल्याला हेंच पाहिजे होतें. त्यानें पदरामध्यें गोऱ्या वेंचून आणिल्या. वृद्धानें स्नान करून चूल मांडली. बोधल्यानें यात्रेकऱ्यांपासून विस्तव मागून आणिला. वेदोक्त मंत्र उच्चारून ऋषिमंडळी ज्याला हवनामध्यें अवदान देतात तो परमपुरुष भक्ताची आवड धरून पीठ मळूं लागला. हा वृत्तांत रुक्मिणीस ज्ञात होऊन तीही वृद्धेचें रूप धारण करून त्या ठिकाणीं प्राप्त झाली. मृदंगाच्या अवसानाप्रमाणेंच ध्वनी उमटतो; ऋतुमानाप्रमाणेंच आकाशाचे रंग बदलतात; दीपकाच्या प्रज्वलितपणाच्या मानानेंच प्रकाशाचें मान असतें. त्याप्रमाणें पांडुरंगाच्या रूपास अनुरूप असें रूप धरून रखुमाई नटली. तोंडाचें बोळकें झालेलें; कपाळीं कुंकवाचा टिळा, शुभ्र वस्त्र परिधान केलेलें, अंगाला सुरकुत्या पडलेल्या अशा थाटानें काठी टेकीत टेकीत ती म्हातारी आपल्या भ्रताराला शोधूं लागली. पानगे भाजीत असलेल्या ब्राह्मणाला पाहून ती हंसून म्हणाली, "आपले यजमान यात्रेला आलेले पाहून आपणच एकटे घाईनें येऊन स्वयंपाकास कसे बसलां? मी स्वयंपाक करितें. आपण उठावें." असें म्हणून म्हातारीनें स्नान केलें आणि ती चुलीपुढें बसली.

आपल्याला आयतीच सुवासिण मिळाली म्हणून बोधल्याला जरा आनंद झाला. पण अन्नाचा अपुरेपणा ध्यानांत आणून तो फिकिरींत पडला. परंतु, बोधल्याला

काळजी करण्याचें कारणच नव्हतें. रांजणांत भागीरथीनें संचार केला म्हणजे त्यांतील जळ आटेल कसें ? गोठ्यामध्यें कामधेनूचें वास्तव्य झालें म्हणजे वैरणीला काय तोटा आहे ? पृथ्वीचेंच लग्न आरंभिलें तर जागेची अडचण असणें शक्यच नाहीं. त्याचप्रमाणें अनंत सिद्धींच्या स्वामिणीचे हात ज्या अन्नास लागले तेथें उणीव कशी पडणार ! रुक्मिणीच्या हस्तांचा स्पर्श होतांच भरपूर अन्न तयार झालें. बोधल्याचें चित्त विक्षेप पावूं नये म्हणून रखुमाबाईनें नुसतें पानगेंच तयार केले व म्हाताऱ्यानें तीन ठाव टाकून बोधल्यासहि हाका मारिली त्यानें मागून बसण्याची इच्छा दर्शविली. ब्राह्मणसुवासिनींचें जेवण उरकल्यानंतर त्यांचें शेषान्न खाण्याकरितां बोधला पात्रावर बसला तोंच ते वृद्धवृद्धेचें जोडपें एकदम अदृश्य झालें. तो प्रकार पाहतांच वृद्धाच्या रूपानें आपणास पांडुरंगानें दर्शन दिलें असें वाटून बोधला देवळांत गेला आणि देवापुढें हात जोडून म्हणाला, " जगज्जीवना, माझ्या कदन्नावर प्रेम धरून तूं मजवर कृपा केलीस. थोरथोरांच्या समाराधनांचा अव्हेर करून तूं मला दीनालाच सांभाळलेंस हें माझें केवढें भाग्य ! "

श्रीमंतांच्या घरीं भोजनसमारंभ झाले तरी ते नुसते लौकिकीच असतात; त्यांत भक्तिभावाचा संबंध नसतो हें बोधल्यास दाखविण्याकरितां पांडुरंग त्यास घेऊन एका सावकाराच्या तंबूत विप्रवेषानें गेले. तेथें सहस्र भोजन चाललें होतें. ब्राह्मणांची हजार संख्या भरली होती. हजार ब्राह्मण पाटावर बसले होते. उत्तम प्रकारचें मिष्टान्न वाढून पात्रें तयार होतीं. इतक्यांत पांडुरंगांनीं म्हाताऱ्याच्या वेषानें त्या पंक्तींत प्रवेश करून अन्नाची याचना केली. सावकारानें ब्राह्मणास सांगितलें " आमची हजाराची संख्या भरली आहे. तुमची सोय होणार नाहीं. तुम्ही येथून चालते व्हा आधी " यानंतर ' एका ब्राह्मणाची सोय न होण्यास काय झालें ? ' असें म्हणून ब्राह्मण कांपत कांपत तसाच एका पाटावर बसण्याचा यत्न करूं लागला. तें पाहतांच यजमानानें सेवकास आज्ञा करून त्या ब्राह्मणास शेंडी ओढून व गचांडी देऊन तेथून हाकालले. तो वृद्ध विन्मुख होऊन लांब जाऊन उभा राहिला. इतक्यांत तूप वाढणें होवून पुरोहितानें संकल्प सोडिला आणि आमंत्रित ब्राह्मण जेवावयास बसले. हें पाहून तो म्हातारा घराबाहेर चालता झाला.

प्राणानें कुडीचा त्याग केला म्हणजे देहाला जसा कल्पांत ओढवतो त्याप्रमाणें परमात्मा पाठमोरा होतांच तेथें भयंकर विघ्न प्राप्त झालें. सोसाट्याचा वारा सुटून आकाश धुळीनें व्याप्त झालें. भोजनांतील सर्व पानांत माती कालविली. कनात व मंडप तुटून खालीं पडला. पानें उडून गेलीं. ब्राह्मणमंडळी पानांवरून उठून धांवूं लागलीं. मंडपांतून वरमायच रुसून गेली म्हणजे बाकीच्या वऱ्हाडणी अर्थातच उठणार. गायीनें वासरालाच पान्हा सोडला नाहीं तर मग घरधन्याला दुग्ध कोठून प्राप्त होणार ? विप्रमुखाच्या साधनानें अन्नग्रहण करणारा अन्नाचा भोक्ता जो पांडुरंग तोच विन्मुख होऊन गेल्यावर अशी दशा व्हावयाचीच !

हा सर्व प्रकार बोधल्यानें पाहिल्यावर देव त्याला बोलले कीं, "बहुतेक लोक असेच दांभिक आहेत. शुद्ध भावानें दिलेलें कदान्नही मला गोडच लागतें. दुर्योधनाची श्रीमंती, सत्कार अव्हेरून मी विदुराच्या घरीं कण्या खाण्यांतच गोडी मानली. सती द्रौपदीच्या घरचें भाजीचें पान खाऊनच मला समाधान वाटलें. गोपाळांचें उच्छिष्ट व ऋषपत्न्यांचें अन्न भक्षण करण्यांतच मला आनंद झाला.

देवाचें भक्तिपक्षपाताचें भाषण ऐकून बोधल्याला प्रेमाचें भरतें आलें. त्यानें देवाच्या चरणाला मिठी मारली. नंतर मोठ्या कष्टानें देवाचा निरोप घेऊन तो आपल्या धामणगांवाकडे चालूं लागला.

मार्गक्रमण करीत असतां बोधला एका रुक्ष अरण्यांत प्राप्त झाला. त्याला फार तहान लागली. जवळपास पाणीही दिसेना व एखादा गांवही दृष्टीस पडेना. तेव्हां भक्ताचें मानस जाणून विठ्ठलानें जवळच मळा निर्माण केला. रुक्मिणीकडून बोधल्याला पाचारण करून पांडुरंगानीं माळ्याच्या रूपानें त्यास पुष्कळ फळें वगैरे खायला घालून थंड पाणीही पाजिलें. बोधला पाठमोरा होतांच तो मळा वगैरे सर्व गुप्त झालें. तो सर्व अद्भुत प्रकार पंढरीनाथांनींच केला अशी खात्री वाटून बोधला आपल्या गांवीं जाऊन पोंचला.

घरीं गेल्यानंतर कांहीं दिवसांनीं बोधला आपल्या शेताची राखण करीत होता. त्याचें चित्त नामस्मरणांत गुंतलें होतें. पांखरें कणसांतील धान्यकण खुशाल खात होतीं. सर्वभूतीं रुक्मिणीकांत आहे अशा समजुतीनें बोधला पांखरांस न हाणतां गोफण डोक्याला गुंडाळून बसला होता. अशा समयास त्याची बायको भाकरी घेऊन शेतांत आली. तिनें तो प्रकार पाहिला. आपला नवरा शेतांतील कणस याचकांना वाटून टाकतो असेंही तिला कळलेलें होतें. दोन्ही गोष्टी ध्यानांत घेऊन नवऱ्यानें तसें करूं नये म्हणून तिनें त्याला विठोबाची शपथ घातली.

बायको शपथ घालून घरीं गेल्यानंतर पंढरीचे वारकरी शेतांतून चालले आहेत असें त्यास दिसलें. बोधल्यानें धांवत जाऊन त्यांना नमस्कार घातला. बोधल्याचा लौकिक आठवून याचकांनीं त्याच्याजवळ कणसें मागितलीं. तेव्हां बोधला म्हणाला, "कोणासही कणसें उचलून न देण्याबद्दल माझ्या बायकोनें मला विठ्ठलाची आण घातली आहे. तरी तुम्ही आपल्या हातांनीं कणसें तोडून न्या."

बोधल्याची परवानगी मिळतांच वारकरी लोकांनी सर्व शेत फस्त केलें. हा वृत्तांत गांवांत समजला. त्याचा वडील मुलगा लागलीच शेतांत आला. शेतांतील सर्व ताटें थोटीं झालेलीं पाहून त्याला मोठी उद्विग्नता प्राप्त झाली. त्याची स्थिति अवलोकन करून बोधल्यानें त्याला उपदेश केला कीं, "बापा; तुला या जीवांचें लक्षण सांगतों तें ऐकून तूं कृपणपणा टाकून दे. मधुमक्षिका आपण स्वतः उपाशी राहून मध सांठवितात. तो रस पारधी घेऊन गेले म्हणजे त्या माशा जशा तळमळतात तसा तूं व्यर्थ तळमळूं

नको. संसाररहाटी करणाऱ्या लोकांच्या धनधान्याची वाट अशीच आहे. आज आपलें शेत संताकरितां खर्ची पडलें असून तूं चिंताक्रांत कां म्हणून होतेस ?"

बापाचा उपदेश ऐकतांच मुलाच्या मनांत अनुताप उद्भवला. हरणाच्या पाडसांना किरणाचें ज्ञान फारसें शिकवावें लागत नाहीं; पक्ष्याच्या पिलांना उडण्याला शिकविण्यास फारसे आयास पडत नाहींत; माशाच्या पिलांना पोहण्याचें ज्ञान करून देण्याकरितां सांगड बांधण्याची विशेष जरूर नाहीं. त्याप्रमाणें यमाजीचें चित्त अनुतापी बनविण्यास बोधल्याला मोठेसें सायास करावे लागले नाहींत. यमाजीनें लागलीच बापाला हातीं धरून घरीं नेले आणि शेतांतील सर्व मजकूर ममताईस निवेदन केला. आपल्या नवऱ्यानें सत्पात्री दान केलें याबद्दल ममताईसही समाधान वाटलें.

बोधल्याच्या या औदार्यानें दुर्जन व पातकी लोक रिकामेच संतापले. बोधल्याला मोठीशी श्रीमंती नसतांना त्यानें मोठ्या श्रीमंतास लज्जा वाटण्यासारखें औदार्य दाखविलें हें न साहून दुर्जनांनीं त्याला अडचणींत लोटण्याचा यत्न चालविला. त्यांनीं आपसांत कट करून जमीनदाराचे कान फुंकले आणि बोधल्याचा सात होन सारा प्रथम वसूल करण्याची तसदी लावली. बोधल्याच्या दारांत सारा-वसुली हवालदाराचा तगादा बसला. बोधल्याजवळ तीन होन शिल्लक होते. आणखी चार होन जमविण्याकरितां तो नागाऊ नांवाच्या एका ब्राह्मणीण सावकारणीकडे गेला. तिनें त्याला दुसऱ्या दिवशीं चार होन कर्ज देण्याचें कबूल केलें. दुसऱ्या दिवशीं तिला गांवात बातमी लागली कीं, बोधल्यानें आपले शेत वाटून टाकून तो कफल्लक बनला आहे; तेव्हां बोधला येतांच तिनें कर्ज देण्याचें वचन परत घेतलें. नागाऊनें आरणांस फसविलें तेव्हां निराश होऊन बोधला परत गेला आणि चिंतातुर होऊन बसला चार होन उसने देण्याजोगा दुसरा सावकार त्याच्या ध्यानांत येईना. तेव्हां तसा एखादा सावकार हुडकण्याकरितां बोधला राळेरासीस निघून गेला.

बोधल्यानें गृहाचा त्याग केला याचा शोध लागतांच गांवांमध्यें तो फरारी झाल्याचा पुकारा झाला. दारांत बसलेल्या हवालदारानें दार बंद पाडलें. तो आंतून कोणासहि बाहेर येऊं देईना व बाहेरून कोणास आंत जाऊं देईना. बोधल्याच्या घरादारची अशी अनास्था पाहून परमात्मा करुणायुक्त झाला. त्यानें लागलींच गांवांतील विठ्या महाराचा वेष घेतला. आपल्याबरोबर सात होन घेऊन विठ्यानें ते चावडीवर नेऊन बोधल्याच्या नांवें जमा करण्यास सांगितलें. गांवकऱ्यांनीं ते हान दिवाणाकडे पाठवून दिले.

दुसऱ्या दिवशीं बोधला होन घेऊन आपल्या गांवीं आला. तो सारा भरण्यास चावडीवर येतो तो त्याला आपला सारा चुकता झाल्याचें वर्तमान समजलें. हा प्रकार

काय आहे याबद्दल त्यानें प्रथम बायकोला व मुलाला विचारलें. त्यांना कांहींच बातमी नाहींसें कळतांच तो विठ्या महाराकडे जाऊन होनाबद्दल विचारूं लागला. विठ्याच्या घरीं एका दिवसाचेंहि अन्न नाहीं तेव्हां तो होन कोठले भरणार असें त्याचें बोलणें ऐकून बोधल्याच्या चित्तांत खूण पटली. आपलें संकट जाणून पांडुरंगानेंच सारा भरला असावा असा भरंवसा वाटून बोधला गहिंवरला. आपणाकरितां विठ्ठलाला श्रम पडले असें वाटून तो रडूं लागला. त्याला परमात्मभजनाचें वेड लागलें असून नाशवंत जड शरीरावरील त्याचें प्रेम सुटलें असल्याकारणानें त्याला विठ्ठलदर्शनाची उत्कंठा लागली. त्याचा शुद्ध हेतु जाणून पांडुरंग सगुणरूपानें त्याच्या पुढें प्रगट झाले. देवाला नमस्कार घालून त्यानें त्यांस होनाचा मजकूर विचारला. विठ्ठलानें सांगितलें, " मी नागाऊचे चार होन चोरून आणिले व त्यांत घरचे तीन भरीला घालून तुझा सारा भागविला."

देवांनीं त्या गरीब नागाऊस नागविलें ह्याबद्दल खेद व्यक्त करून बोधला तिचे होन परत देण्याकरितां निघाला. पण त्यास प्रतिकार करून देवांनीं सांगितलें " तूं जर तिचे होन परत देशील तर तिनें पुरून ठेविलेली तिची सर्व संपत्ती मी नाहींशी करीन."

देवापुढें नाइलाज होऊन बोधला स्वस्थ बसला. त्यानें भगवंतांच्या पायास मिठी मारिली. याच प्रसंगीं आणखी एक असा चमत्कार घडला कीं, बोधल्याच्या शेतांतील थोट्या ताटांस कणसें आलीं कित्येक दिवस रिकामीं पडलेली पेवें धान्यानें भरून गेली. ' हा प्रकार पाहून बोधल्याला परमेश्वर प्रसन्न असल्याबद्दल सर्वांची खात्री झाली. सर्वजणांना तो प्राकृत नर नसून ईश्वराचा अवतार आहे असें वाटलें.

पुन्हां एकदां बोधला शेताची राखण करीत असतां हांसी नांवाच्या कुणबिणीनें तेथें येऊन बोधल्यास वंदन केलें. ही हांसी कुणबीण राळेरासची राहणारी होती. राळेरासचा पाटील हा बोधल्याचा सासरा होय. निवर्तल्यानंतर ममताईचें माहेर बंद झालें. कारण ममताईचे दोन बंधु जिवंत होते; पण ते दुष्ट असल्यानें बहिणीची मुळींच वास्तपुस्त करीत नसत. त्यांच्या घरीं ही हांसी दासीचें काम करून असे.

राळेरास आणि धांमणगांव यांची शीव एकवट होती. त्या शिवेला चिटकूनच असलेल्या एका शेतांत ही हांसी राखण करी. त्याच्या संनिधच बोधल्याचें शेत असल्यानें त्याच्या तोंडून निघणारें हरिभजन सहजगत्याच हांसीच्या कानीं पडे. एके समयीं त्या हांसीनें बोधल्याचे पाय धरून त्यास आपल्या सार्थकतेचा उपाय विचारला. ती दासी पराधीन असल्यानें तिच्या हातून जप, तप, व्रत, तीर्थ कांहीं एक होणार नाहीं असें जाणून बोधल्यानें तिला सांगितलें " संसारधंदा चालवीत असतां हृदयांमध्यें निरंतर हरीचें नाम घेत असावें. दर पंधरवड्याच्या एकादशीला उपास करून हरिकीर्तन

ऐकण्यासाठीं घामणगांवीं जावें असा क्रम पाळण्याची आपल्या धन्याजवळून परवानगी मिळवावी; याप्रमाणें वर्तन केल्यास पांडुरंगाच्या सगुणस्वरूपाचें दर्शन होऊन तुझें सार्थक होईल. हरिनामावर भरंवसा मात्र पूर्ण ठेविला पाहिजे."

बोधल्याचीं वचनें ऐकून हांसीनें त्याच्या पायास मिठी मारली. तिला संतांच्या उपदेशांतील धोरणाबद्दल आदर वाटला. ज्याप्रमाणें रोगमानाप्रमाणें वैद्य औषधाची योजना करितो, योग्य राजपुरुष प्रधानकीच्या जागेस अनुरूप असेंच कार्य प्रधानाला सांगतो, भली सासु सुनांच्या धोरणानें त्यांना वागविण्यांत शहाणपणा दाखविते, विचारवंत सावकार कुळाच्या स्थितीनुसार त्याला कर्ज देतो, चतुर वक्ता सभेच्या स्थितीनुसार व्याख्यान देतो, दगडाच्या कठीण व मऊपणाच्या धोरणानेंच पाथरवट टाकी वापरतो त्याचप्रमाणें संतजन मुमुक्षूच्या अधिकार परत्वेंच त्याला साधन सांगतात ' असें तत्व जाणून ती दासी हांसी बोधल्याच्या उपदेशाप्रमाणें वागूं लागली.

एकादशीच्या दिवशीं मोठ्या पहाटेस उठून हांसी आपला कामधंदा आटपी, नंतर धन्याची आज्ञा घेऊन घामणगांवीं जाई. कीर्तनास पुष्कळ लोक जमत. त्यांच्याकरितां हांसी दोन रांजण पाणी भरून ठेवी. श्रोतेजनांना बसण्याकरितां ती जागा झाडून साफ करून ठेवी. पृथ्वीरूपी आसनावर आणि आकाशरूपी मंडपाखालीं बोधल्याचें कीर्तन चाले. हांसी तें कीर्तन ऐकून रममाण होत असे.

एके हरिदिनीला कीर्तन चाललें असतां राळेरासकरापैकीं एका मनुष्यास वाटेनें सर्पदंश झाला; सर्पाचें विष जालीम असल्यामुळें त्या मनुष्यास लागलीच फेंडु फुटून वाटेतच त्याचा प्राण गेला. त्याच्या सवंगड्यांनीं त्याचें प्रेत तसेंच उचलून आणून आपल्याजवळ कीर्तनांत ठेविलें. तें प्रेत आहे याचा स्फोट होऊं न देतां त्यांनीं त्या प्रेताच्या निमित्तानें बोधल्याचें सत्य पाहण्याचा आपापसांत बेत ठरविला. बोधला रामनामाची विशेष प्रशंसा करितो ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत होती. ज्या कीर्तनांत बोधला रामनामाची बढाई सांगतो त्या कीर्तनांतच तो मनुष्य साप चावून मेला असा पुकारा करावयाचा अशा संकल्पानें ते लोक त्या प्रेतास आपल्यामध्यें घेऊन कीर्तनास बसले.

( पुढील अंकीं समाप्त )






श्री. ए. एस. नाईक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, शिवाजीगंज, घर नं. १६ हर्दा, मध्यप्रदेश हे लिहितात कीं,

**अनुभव पहिला—**

इ. स. १९१२ सालापासून म्हणजे माझ्या वडिलांच्या वेळेपासून श्रीसाईबाबांची पूजाअर्चा आमच्या घरीं चालू आहे. मला वडिलांबरोबर श्रीबाबांचें दोनवेळां समक्ष दर्शनहि झालें.

ता. ६–२–१९६६ रोजीं साईबाबांचे आज्ञेवरून श्रीची मोठी तसबीर कै. बालकराम मानकर व कै. मुक्ताराम ह्यांजबरोबर हर्दा मध्यप्रदेश मुक्कामी आली. त्यानंतर हर्देस प्लेग फार मोठ्या प्रमाणांत सुरू झाला. सर्व लोक गांव सोडून जाऊं आमचे घरची सर्व मंडळी फक्त वडील सोडून शेतीच्या गांवीं ब्रह्मनगाव मुक्कामीं गेली. श्रीसमर्थांकडे तसबीर खेड्यावर नेण्याची आज्ञा मागितली. श्रीबाबांनी तसबीर हलवूं नका म्हणून लिहिलें कांहीं दिवसांनीं वडिलासहि शिर्डीला बोलावून घेतलें व श्रीनी वडिलांस सांगितलें कीं, अण्णास म्हणजे मला रोज ब्रह्मनगांवाहून येऊन दोन्ही वेळेची पुजा–आरती करून रात्रीं परत गांवी जाण्यास सांग. त्याप्रमाणें वडिलांचें पत्र आलें. तेव्हां जवळ जवळ दोन महिने मी व माझे बंधू बाळासाहेब नाईक व कै. शंकर रोज सकाळीं हर्देस येऊन श्रीसमर्थांची पूजा–आरती करून रात्रीं आठ वाजतां हर्देहून निघून ब्रह्मनगांव मुक्कामी ७ मैल जात होतों. हर्देस रोज प्लेगच्या केसीस होत असत व एकदां तर श्रीसमर्थांचे तसबिरीसमोर दोन उंदीर मेलेले मिळाले. परंतु श्रीच्या कृपेनें आमच्या केसालाही धक्का लागला नाहीं. फोटोसमोर उंदीर मेलेले दिसले तेव्हां मी वडिलांना शिर्डी मुक्कामीं पत्र पाठविलें. त्यावर वडिलांनीं श्रीना पत्र दाखवलें तेव्हां बाबा म्हणाले कीं, 'अल्ला मालीक आहे. आपण कशाला भ्यावें ? असा साईकृपेचा महिमा आहे.'

**अनुभव दुसरा**

सन १९३७ मध्यें मी पोलीसखात्यांत सब. इ. म्हणून वर्धा मुक्कामीं गेलों. ह्यापूर्वी वडील १९३२ पावेतों हर्दा मुक्कामीं श्रीची पूजाअर्चा करीत होते. नंतर आजारपण व वृद्धावस्थेमुळें वडील व मातोश्री माझ्याकडे श्रींचा फोटो घेऊन आले. सन १९३६ सालीं वडील सदुभैया नाईक श्रीचरणी विलीन झाले. माझी फिरतीची नोकरी असल्यामुळें मातोश्री व बंधू शंकर ह्यानीं बाबांचा फोटो शेतीच्या गांवीं घेऊन गेले व तेथें पूजा–आर्ती व सेवा सुरू केली. सन १९४१ मध्यें शंकरही साईचरणीं विलीन झाला. तेव्हां त्या गडबडींत मातोश्रीना माझ्या बहिणीनी इंदूर मुक्कामीं नेलें.

त्या दरम्यान श्रीचा फोटो ब्राह्मणगांव मुक्कामीं चार महिने राहिला व त्याकडे दुर्लक्ष झालें. परंतु श्री बाबांना तें सहन झालें नाहीं. माझे दुसरे बंधू रा. बाळासाहेब नाईक ह्यांस एका रात्रीं धक्के दिले गेले व कोणी म्हणाले, " तूं आरामांत झोपला आहेस ! ह्याचा अर्थ बाळासाहेबांचे लक्षांत त्या रात्रीं आला नाहीं. दुसरे रात्रीं असेच धक्के बसले व श्री म्हणाले, " तूं आराम करतोस आणि माझ्या पायाला मुंग्या चावताहेत ना ! "

नंतर त्याला श्रीच्या प्रासादिक फोटो, जो ब्रह्मनगांव मुक्कामी होता, त्याची एकाएकी आठवण झाली. व ते दुसऱ्या दिवशी इंदूरहून ब्रह्मन गांवी आले व श्रीच्या तसबिरीकडे पहातात तो खरोख बाबांच्या डाव्या पायाच्या अंगठ्याला वाळवी लागली होती. त्यानीं लगेच फ्रेममधून फोटो काढून सर्व वाळवी काढली व तो फोटो इंदूर मुक्कामी नेऊन आपल्या घरी स्थापना त्याची केली आतां बाळा साहेब श्री. ची पूजा आरति करीत असतात. श्रीबाबाची लीला अगाध आहे. आपल्या भक्ताला त्याच्या चुकीबद्दल नेहमी इशारे देऊन ते आपली सेवा करऊन घेतात.

**अनुभव तिसरा**

सन १९५२ मध्यें मी सरकारी नोकरींतून निवृत्त होऊन शेतीच्या गांवी ब्राह्मण गांवाला असतांना माझ्या शेजारचा शेतकरी ( रामकरण गुजर ) ह्याचा नातू किशोर वय चार महिनें तापानें आजारी होता. एक दिवस त्या लहान मुलाची प्रकृति जास्त बिघडली ताप १०४ व नाडीचा पत्ता नाहीं. डोळ्याचे बुब्बूल स्थीर झालेले व खेडें गांव असल्यामुळें वैद्य किंवा डॉक्टरची सोय नाहीं. नव्हती. मी श्रीचरित्र वाचीत असतांना तो शेतकरी माझ्याकडे येऊन रडूं लागला. तेव्हां मी त्यास श्रीसमर्थ बाबांचा फोटो दाखविला व त्यास म्हटलें कीं, ह्या परिस्थितींत बाबांच्याशिवाय कोणीहि तारणार नाहीं. मनापासून नाक घांस व बाबांना नवस कर. त्यांनीं तसें केल्यावर माझ्याकडील बाबांच्या शिर्डी येथील धुणी-

तील उदी मी त्यास देऊन थोडी त्या मुलास पाजण्यास सांगितलें व थोडी अंगास चोळण्यास सांगितलें. तीनचार तासानंतर मी त्या मुलास पहाण्यास गेलों तों काय आश्चर्य ! मुलाला शांत झोप लागलेली नाडीबरोबर व नार्मल टेंपरेचर। त्यानंतर मुलगा बरा झाला व त्याचें साखरेंत तोलादान श्रींच्या फोटोसमोर करून त्या शेतकऱ्यानें नवस फेडला. श्रीसमर्थांची कृपा काळालाहि मार्गे परतवूं शकते. आपली पूर्ण श्रद्धा मात्र पाहिजे.



## ❀ दैवत ❀

माझा साई मज भेटला ऽऽ  
कशास जावू मी पंढरीला ।  
हाच माझा विठू सावळा ॥ ध्रु० ॥

दैवत माझे माझ्या हृदयी ।  
माझ्यासाठी तिष्ठत राही ।  
अखंड आनंदाची ग्वाही ॥ १ ॥

जन्मांतरीचा भोग संपला ।  
भक्तासाठी धावून आला ।  
संत सखा हा शिरडीवाला ॥ २ ॥

छंद जडे याचा चित्ताला ।  
सुखदुःखाशी समरस झाला ।  
भक्तांसाठी नावा भिजला ॥ ३ ॥

—बा. भा. मगदूम

# "लोटी न माघारी, साईशा...."

तव प्रेमाची तळमळ लागुनी
आलो तुझ्या द्वारी । साईशा...
सत्वरी देई दर्शन तूं मज
घेऊनिया पदरी ॥ साईशा... १

रोज सकाळीं नयन उघडितां
जाणिव तुझी होई । साईशा...
तुझीच प्रतिमा दृष्टीस पडतां
वृत्ती होत बावरी ॥ साईशा... २

नित्य कर्म मी करित असतां
त्यांतहि तूं दिससी । साईशा...
पदोपदी तुझी आठवण येतां
कोण सख्या सांवरी ? ॥ साईशा... ३

दोन-प्रहरची तिरीप लागतां
भान न मज राही । साईशा...
उत्कंठा ही शिगेस जाउनी
तुजला पाचारी ॥ साईशा... ४

दिवसभराचीं कामें सरतां
श्रांत शरीर होई । साईशा...
उरत न अंगीं त्राण माझ्या
फडफड जीव करी ॥ साईशा... ५

सांज सरुनि अंधार दाटता
सुचेन मज कांहीं । साईशा...
स्वप्नांतही तूं येउनी जासी
विरह पुन्हां अंतरी ॥ साईशा... ६

आयु-क्रमणा अशी चालतां
उदास मन होई । साईशा...
धाव घेऊनि आलों जवळी
लोटी न माघारी ॥ साईशा... ७

—शाम जुवळे

# श्रद्धा आणि सबुरी

लेखक : पी. बी. के.

श्रीसाईबाबांच्या शिकवणुकीचें सर्व सार ' श्रद्धा ' आणि ' सबुरी ' या दोन अलौकिक शब्दांत सामावलेलें आहे असें म्हटल्यास वस्तुस्थितीचा दोष लागणार नाहीं.

प्रत्येक माणसानें आपल्या ठायीं हे दोन गुण आणण्यासाठीं झटणें हें त्याचें कर्तव्य आहे. ज्याला जीवनांत सुखसमृद्धि व समाधान पाहिजे असेल त्यानें या दोन गुणांची कांस धरणें अत्यावश्यक आहे. या गुणांनीं माणूस पूर्णत्वास पोहोंचूं शकतो आणि अपूर्णांतून पूर्णत्वाकडे पोहोंचण्यासाठींच आपली सारी धडपड चाललेली असते.

या धडपडींत नाना प्रकारच्या संकटांना व आपत्तींना सामना द्यावा लागतो. परंतु ज्याची आपल्या ध्येयावर दृढ श्रद्धा असते तो कितीही संकट कोसळलीं तरी डगमगत नाहीं किंवा निराशेनें हातपाय गाळून बसत नाहीं.

तुमच्यापुढें कोणतेंहि उद्दिष्ट असूं द्या. परीक्षेंत उत्तीर्ण व्हायचें, हातीं घेतलेल्या कोणत्याही उद्योगांत यश मिळवायचें, कोणत्याही सामन्यांत यशस्वी व्हायचें किंवा आणखी कांहींतरी यशस्वी रीतीनें पार पाडायचें. या प्रत्येक बाबतींत तुमच्याजवळ जर श्रद्धेचें बळ बळकट असेल तरच तुम्ही त्यांत यश मिळवूं शकतां.

गोष्ट लहान असो वा मोठी असो. ती पार पाडीत असतां तुमच्या गांठीशीं श्रद्धेची शिदोरी भरपूर असली तर तुम्हीं डगमगायचें कांहीं कारण नाहीं. श्रद्धा लेची-पेची नाहीं कामाची. ती खंबीर व बळकट असली पाहिजे.

श्रद्धा ही हमखास यशाची शिडी आहे. या शिडीच्या पायऱ्या चढून, तुम्हीं वाटेल ती गोष्ट मिळवूं शकतां आणि म्हणूनच बाबांनीं श्रद्धेला सर्वांत महत्त्वाचें स्थान दिलें आहे.

हेंच पहा ना. आमचे या जगांतील सारे व्यवहार वरपांगी चाललेले असतात. जिकडे पहावें तिकडे दिखाऊपणा. अंतःकरणांत श्रद्धेचा ओलावा बिलकूल नसतो. तुम्हीं कोणतीहि गोष्ट मनापासून व आपलें अंतःकरण ओतून केली तर ती यशस्वी रीतीनें पार पडणारच. अंतःकरणापासून म्हणजे संपूर्ण श्रद्धेनें.

सैन्य शत्रूशीं लढत असतें. त्या सैन्यांतील प्रत्येक सैनिकांत मी लढाईंत जिंकणारच ही श्रद्धा जर नसेल तर यशाची आशाच बाळगायला नको. गेल्या वर्षी पाकिस्तानशीं आमच्या सैनिकांचा जो मुकाबला झाला त्यांत आमच्या सैनिकांनीं यश मिळविले तें कशाच्या बळावर ? केवळ श्रद्धेच्या. माणसांत जिद्द उत्पन्न झाली पाहिजे. जिंकूं किंवा मरूं ही श्रद्धा निर्माण झाली पाहिजे. श्रद्धेचे गांठोडे ज्यानें जवळ केलें त्यानें नेहमीं यशाचीच खात्री बाळगावी.

रोजच्या व्यवहारांत असो वा अध्यात्म मार्गांत असो. यशात नेणारी जर कोणती किमया असेल तर ती श्रद्धाच होय. आणि सबुरी ? ती तर बाबांनी सांगितल्याप्रमाणें श्रद्धेची सख्खी बहीण. तिची ताटातूट करून कसें चालेल ?

कोणत्याहि बाबतींत असो. माणसानें अधीर होतां कामा नये. प्रत्येक गोष्ट धिरानें घेतली पाहिजे. अधीरता आली कीं कार्य बिघडलें म्हणून समजा. बोलतांना, कोणतेंही काम करतांना, खातांना, पितांना धीर सांभाळून वागलें पाहिजे. 'पी हळद आणि हो गोरी !' असें कधीं झालें आहे का ?

कोणत्याही गोष्टीचें फळ ताबडतोब मिळेल अशी आपण अपेक्षा कां बाळगावी ? उतावळेपणा जणूं काय आमच्या बारशाला पुजलेला आहे. उतावळेपणामुळें कार्यनाश होतो याचा उमज आम्हांला कधीं पडेल तो पडो !

सबुरी म्हणजे संथपणा, शांतपणा. तुम्हीं श्रद्धासंपन्न आहांत ना ? मग थोडा दम धरायला शिकलें पाहिजे.

---

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमची कोठेंही शाखा नाहीं. ***

# मोक्षासंबंधीं कांहीं विचार

**************************************

—एक ज्ञानवंत

दुःखतापापासून सर्वस्वीं मुक्तता व भगवंताची प्राप्ती म्हणजेच मोक्ष. जोंपर्यंत मनुष्य मोक्ष मिळवूं शकत नाहीं तोंपर्यंत त्याला शांततेचा लाभ होणें कठीण आहे. शांतता म्हणजेच पराकाष्ठेचें सुख. कित्येक लोकांना वाटत असतें कीं, मोक्ष तो काय ! तो सहज प्राप्त करून घेतां येईल. बरोबर आहे. ज्यानी मोक्ष म्हणजे काय, याबद्दल कधीं विचारच केला नाहीं, त्यांना मोक्षासाठीं किती यातायाती कराव्या लागतात याची कशी बरें कल्पना करतां येणार ? मनुष्याला आपण कोण आहोंत, याचें अगोदर ज्ञान झालें पाहिजे. त्यानंतर मोक्षाचा विचार.

× × ×

मी कोण ? अर्थात् आत्मज्ञान झाल्याशिवाय कोणालाही मुक्ति मिळविण्याचा मार्ग सांपडणार नाहीं. मुक्तीचें स्वरूप काय यासंबंधानें लोकांच्या वेगवेगळ्या कल्पना आहेत. कांहीं लोकांना वाटतें कीं, या मृत्युलोकांत पुन्हां जन्म न घेणें व स्वर्गलोकांत किंवा दुसऱ्या कोणत्या तरी सुखाच्या जगांत वास्तव्य करणें म्हणजे मोक्ष; परंतु हा विचार चुकीचा आहे. जसा मृत्युलोक नाशवंत आहे; त्याचप्रमाणें सर्व लोक भिन्न कालांतरानें नाश पावणारे आहेत. या लोकांत माणसांस जशी सुखदुःखें भोगावीं लागतात, त्याचप्रमाणें देवलोकांतहि भोगावीं लागतात. जें जें अवतीर्ण झालें तें तें नाश पावणारच. आपण देहरूपानें जन्म घेतला, तो देह कितीहि दिव्य बनविला तरी त्याचा कधीं ना कधीं नाश हा होणारच. तेव्हां प्रत्येक माणसाला आपल्या स्वरूपाची ओळख पटली पाहिजे, मी कोण हें समजलें पाहिजे. तें समजल्याशिवाय मुक्तता नाहीं.

× × ×

मुक्तीची, मोक्षाची अपेक्षा करणाऱ्यानें स्वतःच्या मनाशीं एका गोष्टीचा पक्का निर्णय केला पाहिजे. कोणत्या गोष्टीचा ? शरीर, मन, इंद्रियें, बुद्धि यांपैकीं मी कोणीही नाहीं. मी आत्माराम आहें. त्याच्याशीं कोणाचाही संबंध येत नाहीं. याचें चिंतन माणसानें निरंतर केलें पाहिजे. ते विचार म्हणजे त्याचा निदिध्यास झाला पाहिजे. ते विचार त्यानें आत्मसात् करण्यासाठीं झटलें पाहिजे. मी सच्चिदानंद आत्मा आहें. त्याशिवाय मी दुसरें कांहीं नाहीं.

मी कोण ? मी म्हणजे एक शरीर हा विचार जोंपर्यंत मनांत येत राहील, तोंपर्यंत देहबंधनांतून कधींही सुटका होणार नाहीं. मी शरीर नसून आत्मा आहें माझ्या ठायीं भगवंताचें वास्तव्य आहे, याची माणसाला पूर्ण जाणीव झाली पाहिजे, तरच त्याची नाना बंधनांतून सुटका होईल.

× × ×

आत्मा आमच्याजवळ असतां आम्हीं त्याच्यापासून दुरावलेले आहोंत. याचें कारण जन्मजन्मांतरींचे आमच्यावर जडलेले संस्कार. त्या संस्कारांच्या पकडींत आम्हीं सांपडलेले आहोंत. ती पकड दूर करतां आली पाहिजे. ही पकड दूर होण्याचे किंवा तिच्यांतून सुटका करून घेण्याचे मार्ग आहेत. त्या मार्गांचा अवलंब आपण केला पाहिजे. सत्संग हा त्यापैकीं एक सुंदर मार्ग आहे. सत्संगानें दृढ झालेले संस्कार ढिले होऊं लागतात. त्यासाठीं सत्संगाची कांस धरली पाहिजे.

× × ×

जन्म होत असतो शरिराचा—देहाचा. वाढ होते शरिराची. क्षीण होतें शरीर. वृद्ध होतें शरीर व नाश जो होतो तो शरिराचा, परंतु या सर्व अवस्थांमध्ये अंतरात्मा जो असतो तो वाढत नाहीं कीं क्षीण होत नाहीं व नाशहि पावत नाहीं. तो सर्व कांहीं आमच्यासाठीं साक्षीरुपानें राहून पहात असतो. त्याला नाहीं जन्म, नाहीं वाढ, नाहीं मरण—तो अमर आहे. त्याला अग्नि जाळूं शकत नाहीं, पाणी बुडवूं शकत नाहीं, कोणतेंहि शस्त्र त्याची काटाकट करूं शकत नाहीं. तो आत्मा सदा शांत, निर्विकार असतो. तो आत्मा मी आहे.

× × ×

अशा आत्मसाक्षात्कार व्हावा यासाठीं झटणें हेंच जीवनाचें सार्थक.

# बाबांना लबाडी खपत नसे

लेखक : आप्पाराव

साईबाबांना लबाडी, थोतांड किंवा खोटेपणा मुळींच आवडत नसे. आपल्या हयातींत तशा प्रकारचें कोणाचें वर्तन आढळून आल्यास ते तात्काळ त्याची कानउघाडणी करीत असत.

आपली योग्यता जी आहे ती आहे. ती जास्त आहे, आपण कोणीतरी मोठे आहोंत असा खोटा आभास निर्माण करण्याचा कोणींही प्रयत्न करूं नये. व्यवहारांत तो आभास कधींना कधीं नडल्याशिवाय व आंगलट आल्याशिवाय रहाणार नाहीं.

× × ×

शिरडीं येथें साईबाबांचें वास्तव्य असतां तेथें नाना प्रकारचे लोक येत जात असत. प्रत्येकाचा हेतू वेगवेगळा असे. बुवाबाजी करून लोकांची फसवणूक करणारे जसे आज ढोंगीबुवा कुठें कुठें आढळून येतात त्याचप्रमाणें त्याकाळींहि त्यांचें पीक येत असेच. प्रत्यक्ष श्रीसाईबाबांसमोर बुवाबाजी करायला कांहीं ढोंगी लोक मागें पुढें पहात नसत. साईबाबा अशा ढोंगी बुवांचे ढोंग चव्हाट्यावर आणल्याशिवाय रहात नसत. 'बरोबरी करायला पहातोस काय!' असें म्हणून एका वाक्यांत ते त्यांची कानउघडणी करीत असत. समजणारे समजत व शहाणे होत असत; परंतु जे आपलें ढोंगसोंग तसेंच चालू ठेवीत त्यांना ठेचा लागल्याशिवाय व जरूर तें शासन मिळाल्याशिवाय रहात नसे.

× × ×

या जगांत खोटें नाणें कधींही शेवटपर्यंत चालू शकत नाहीं. हातचलाखी करून एकाद्यास तुम्हीं एक वेळ फसवाल, परंतु पुन्हां पुन्हां फसवतां येणार नाहीं. त्या पापाचा मुबेंड तुम्हांला आज ना उद्यां भरावा लागणारच लागणार. शिरडींत आलेल्या अशा अनेक ढोंगी बुवांची फटफजिती करून साईबाबांनी त्यांना शहाणे करून परत पाठविलें

आहे. एखाद्या माणसाच्या अंतरीच्या कळा काय आहेत, हें दिव्य दृष्टीनें बाबा तत्काळ जाणत असत व त्याचें बिंग त्याला सहज समजेल अशा रीतीनें बाहेर फोडीत असत.

× × ×

साईबाबा समाधिस्त झाल्यानंतरच्या काळापासून तों आजतागायत स्वतःचा तळीराम गार करून घेण्यासाठीं शेंकडों नव्हे, हजारों लोकांनीं 'मी साईबाबांचा वारस किंवा त्यांचा प्रति अवतार आहे' असें सांगून जनतेला लुबाडण्याचा उद्योग करून पाहिला; याचें कारण जनतेचा भोळसटपणा होय. भोळेपणा फार वाईट. आपणास खरेंखोटें याची पारख करतां आली पाहिजे. ती जर करतां आली नाहीं तर तुमचा जन्म व्यर्थ होय.

× × ×

साईबाबांवर तुमची केवढीही श्रद्धा असेना का. ती श्रद्धा वाटेल त्याच्यावर ठेवायची नसते. आपला कार्यभाग साध्य करून घेण्यासाठीं कोणी तुम्हांला मी प्रति-साईबाबा आहे म्हणून सांगेल तर कोणी साईबाबासारखा पेहराव करून तुमच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचा प्रयत्न करील. साईबाबावरील भक्तिभावामुळें तुम्ही त्या सांगण्याला किंवा त्या पेहेरावाला नाहक बळी पडतां कामा नये.

× × ×

बाबांनीं शिरडींत देह ठेविला त्यावेळची एक घटना सांगतों. स्वार्थी व थोतांडी लोकांना आपला कार्यभाग साधून घेण्याची ती एक संधी होती. तशी संधी घेणें घातुक आहे, याची स्वार्थी लोकांस कल्पनाहि शिवत नाहीं. खानदेशांत रावेर या नांवाचें एक गांव आहे. तेथील मुक्ताराम या नांवाचा एक गृहस्थ शिरडी येथें बाबांच्या सान्निध्यांत येऊन राहिले होता. त्याचा स्वार्थी व आपमतलबी स्वभाव गेलेला नव्हता. त्यांना वाटलें आतां चांगली संधी आलेली आहे. साधून घेऊं या. बाबा समाधिस्थ होण्यापूर्वी त्यांच्या दर्शनास येणारे असंख्य लोक त्यांना भक्तिभावानें वाटेल तें स्वखुषीनें कसें अर्पण करीत असत हें प्रत्यक्ष डोळ्यांनीं त्यानी पाहिलें होते. त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें. बाबांनीं समाधि घेतल्यानंतर १।२ दिवसहि लोटले असतील, नसतील; तोंच ते मुक्तारामबुवा लोकांना सांगूं लागले कीं, साईबाबांचा मीच वारस आहे. आपल्यामागें द्वारकामाईत त्यांच्या आसनावर बसण्याचा आदेश त्यांनीं मला दिला आहे. यापुढें मीच साईबाबा असें समजून सर्वांनीं माझ्याशीं वागायचें !

× × ×

केवढें हें त्या माणसाचें धारिष्ट्य ! साईबाबांचा वारसदार म्हणून ही स्वारी द्वारकामाईंत बसूं लागली. माझा कोणी वारस नाहीं, असें साईबाबांनी अनेक वेळां जवळपासच्या लोकांना सांगितलें होतें. तेव्हां मुक्तारामवर विश्वास कोण ठेवणार ! बाबांच्या विश्वासांतील त्यांचे निकटवर्ती भक्त तात्याबा कोते पाटील, रामचंद्र पाटील वगैरे भक्तांनीं त्या गृहस्थास असें न करण्याबद्दल पुष्कळ सांगून पाहिलें. त्याची परोपरीनें समजूत घालण्याचा शक्य तेवढा प्रयत्न करण्यांत आला, परंतु त्या गृहस्थाला गुरुबाजीचा कैफ चढलेला होता. ती स्वारी कांहीं केल्या ऐकेना.

× × ×

बाबा ज्या आसनावर बसत त्या आसनावर मुक्ताराम बसूं लागले ! केवढें त्याचें धारिष्ट्य ! काय झाला त्याचा परिणाम ? त्या आसनावर बसल्यानंतर थोड्याच वेळानें त्यांना खालून सुया टोंचूं बोचूं लागल्या. फार काय, रक्त येऊं लागलें. असह्य वेदना होऊं लागल्या ! ती जागा सोडून मुक्तारारामजी दुसऱ्या बाजूला जवळपास बसण्याचा प्रयत्न करूं लागले. तरीही तोच अनुभव ! अशा हालअपेष्टा सतत सात–आठ दिवस त्यांनीं भोगल्या व शेवटी बाबांची क्षमा मागून त्यांनीं प्राण सोडला !

MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop*. S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

# श्री साईनाथ हॉस्पिटल

## मुंबई ऑफिसांत जमा

(दि. १-४-६६ ते ३१-८-६६)

| | | चेकने आलेले रु. |
|---|---|---|
| डॉ. होमी बाटलीवाला | मुंबई | ७७७ |
| श्री. एम. डी. मेहता | ,, | ५०१ |
| ,, डी. आर. पटेल | ग्वाल्हेर | ३५१ |
| ,, आर. एम. वकील | मुंबई | ३०० |
| ,, रसिक शहा | मुंबई | २७५ |
| ,, एस. एम. पंड्या | ,, | २५१ |
| मि. व मिसेस ए. व्ही. सुमती | मंगलोर | १७५ |
| श्री. जे. एम. घोलकर | दिल्ली | १५२ |
| लेफ्ट. दयाशंकर | ,, | १५१ |
| श्री. सी. डी. अमीन | किसुमु | १५० |
| ,, आर. व्ही. डीवेचा | मुंबई | १०० |
| ,, प्रवरे | ,, | १३२ |
| ,, ए. जी. आगास्कर | अंबरनाथ | १०१ |
| ,, आर. जी. देसाई | कंपाला | ६६-६६ |
| डॉ. चंपा आफळे | दिल्ली | ५५ |
| श्री. आर. एच. टिपणीस | बल्ली | ५४ |
| ,, जे. एल. गांधी | जगदिलपूर | ५० |
| ,, व्ही. हन्बाळी | पुणें | ५० |
| ,, जे. एल. जगदेव | दारदा | ५० |
| मेजर एच. सी. घोडपकर | दिल्ली | २५ |
| श्री. व्ही. जी. खेर | साबगर | २० |
| कु. शरयु तळपदे | मुंबई | ११ |
| श्री. के. आगदराव | धार | १० |
| डॉ. एन. डी. दाजी | मुंबई | ५ |

## ब्री. पो. ऑर्डर्सने

| | | |
|---|---|---|
| श्री. मगनलाल पटेल | लीसस्टर | ६६–२५ |
| „ एम. राघवन | बाहरेन | १३–२५ |
| „ साई भक्त | — | ६–६३ |
| „ आर. एम. दबडघाव | जमाईका | ५–९३ |

## रोखीने आलेले

| | | |
|---|---|---|
| श्री. सुरेंद्रराव | मुंबई | ३०१ |
| „ जे. बी. मेहता | सायन | ३०० |
| „ ए. डी मिस्त्री | मुंबई | २२७ |
| मे. गोल्ड सोप कं. | „ | १३५ |
| श्री. जयंत एच. पटेल | न्युझीलंड | १०५ |
| „ व्ही. परेख | मुंबई | १०१ |
| „ जी. राया | इराण | १०१ |
| श्रीमती विजया क्षीरसागर | दादर | १०१ |
| श्री. डी. पी. कुमार | खार | ५१ |
| „ सी. ई. माहीमकर ५ वा रस्ता | मुंबई | ५१ |
| „ एस. एस. केरकर | „ | ५१ |
| डॉ. यशवंतराव सावंत | अंधेरी | ५१ |
| श्री. टी. जी. पाटील | नांदेड | ३५ |
| श्रीमती सरोजनी रामनाथ | मुंबई | २५ |
| श्री. आर. के. केणी | „ | २५ |
| „ बी. के. वागळे | न्युझीलंड | २० |
| „ एन. जी. गोपाळ आयार | अय्यर | १७ |
| „ के. डी. मेहता | मुंबई | १६ |
| „ एस. जी. तोडणकर | बोरीवली | ११ |
| „ बी. एम्. चौबळ | अंधेरी | ११ |

| | | |
|---|---|---|
| ,, अमीन | मुंबई | १६ |
| ,, एम. एस. डांगे | दादर | ११ |
| श्रीसाईभक्त ( अनेक ) | मुंबई | ५५ |
| ,, एस. पी. राय | खार | ११ |
| ,, के. एम. बागवे | मुंबई | १० |
| कु. सुधा व उषा पोतनीस | दादर | ८–५० |
| ,, सुधा व विजया पोतनीस | ,, | ८–५० |
| ,, जे. एम. चौबळ | ,, | ५ |
| ,, एस. एच. चौबळ | अंधेरी ( ५+५ ) | १० |
| ,, जे. एस. चौबळ | ,, ( ५+५ ) | १० |
| शिक्षणफंड | | |
| ,, जी. आर. वेंगुर्लेकर | मुंबई | ५१ |


# लहान मुलांच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.




# सप्टेंबर १९६६

या महिन्यांत श्रीसाईबाबांच्या दर्शनास बाहेर गांवचे भक्त नेहमीप्रमाणें आले होते. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन**

श्री. ह. भ. प. पांडुरंग गंगाधर वैद्य, श्रीक्षेत्र पंढरपूर. व सं. गवई, यांचीं या महिन्यांत श्रावण व. ११ व श्रावण व. १४ श्री अहिल्याबाई होळकर पुण्यतिथीनिमित्त कीर्तन व भाद्रपद शु. ४ श्री गणेशचतुर्थी निमित्त कीर्तन अशीं कीर्तनें झालीं.

**गायन**

श्री. इच्छाशंकर हरजीवन जोशी, मुंबई
श्री. स्वामी सच्चिदानंद ( विठ्ठलाश्रम )
मुनी किरेतो, मु. ऋषीकेश, हरिद्वार हिमालय,
श्री. मारुती पंढरीनाथ पवार, राममंदिर–रत्नागिरी.

**नकला ( व्यक्तिदर्शन )**

श्री. सुवास दिगंबर देशपांडे मु. कल्याण, जि. ठाणें.

**कलापथक**

श्री. नृत्यदर्शन कलापथक ४०७ नानापेठ, पुणें २
श्री. अप्पासाहेब इनामदार, सदाशिव पुणें २.
वंदना डॅन्सिंग पार्टी, श्री. शांताम गायकवाड, पुणें २

**लोकनाट्य**

जाणकार लोकनाट्य मंडळ मुंबई प्रो. जयवंत कुलकर्णी विलेपारले, मुंबई ५७.

**संस्थान नोकर भजन मंडळ**

या महिन्यांत संस्थान नोकर भजन मंडळाचा कार्यक्रम झाला. मे. माननीय रिसीव्हरसाहेब स्वतः हजर राहून भजन म्हणण्यांत भाग घेऊन मार्गदर्शन केलें.

साई संस्थान कर्मचारी यांनी कै. दीक्षित वाड्याचे माडीवर श्री गणपती उत्सव सालाबादप्रमाणें साजरा केला. त्यांत संस्थान नोकर भजन मंडळाचा कार्यक्रम झाला.

**मोठ्या माणसांच्या भेटी**

(१) ना. संजीव रेड्डी, केंद्रीय मंत्री. न्यू दिल्ली.

(२) मे. एस. आर. पाटकर महापौर, मुंबई नगरपालिका.

(३) मे. एस. राममूर्ति—कलेक्टर, अहमदनगर.

(४) मे. ओ. पी. मेहरा, व्हा. मार्शल, नागपूर.

(५) मे. एम. ए. राव, मेंबर रेल्वे बोर्ड, नवी दिल्ली.

(६) मे. पी. आर. वझे, इंजिनीयर म. रा. पुणे.

शिर्डी येथील हवापाणी चांगलें आहे व रोगराई कांहीं नाहीं.


## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी—किंमत टपाल खर्चासह ( स्टँप–तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

**श्री साईलीला मासिक**

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४–०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | by Pradhan | १–०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १–०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगारकरकृत | २–०० |
| (९) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१४) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१५) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (१७) | **Guide to Shirdi** | (English) | | ००–१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00–37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00–50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi, Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आ णि म्ह णू न च

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सॅंडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

**साईनिकेतन**, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : बी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,